विनम्र अभिवादन



आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन.
– व्यवस्थापक

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक १३ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# मुर्शिदाबादमध्ये केंद्रीय दल तैनात; ३ मृत्यू, १२० हून अधिक अटक

## कलकत्ता उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

मुर्शिदाबाद, पश्चिम बंगाल : वक्फ (सुधारणा) कायद्याविरोधातील सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान मुर्शिदाबादमध्ये हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसाचारात आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला असून १२० हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. मृतांमध्ये एक पिता-पुत्र देखील आहे, ज्यांची हत्या त्यांच्या घरी चाकूने वार करून करण्यात आली. घरात लूट देखील झाल्याची माहिती मृतांच्या नातेवाइकांनी दिली आहे.



हिंसाचार वाढल्याच्या पार्श्वभूमीवर कलकत्ता उच्च न्यायालयाने मोठा निर्णय घेतला असून मुर्शिदाबाद जिल्ह्यातील अति-संवेदनशील भागांमध्ये केंद्रीय सुरक्षा दलांची पथके तात्काळ तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय न्यायमूर्ती सौमेन सेन आणि न्यायमूर्ती राजा बसू चौधुरी यांच्या खंडपीठाने दिला आहे. विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी ही मागणी न्यायालयात केली होती.

जाफराबाद आणि सजूरमोर परिसरात मोठ्या प्रमाणावर हल्ले

मुर्शिदाबाद जिल्ह्यातील शमशेरगंज व सुती भागांमध्ये परिस्थिती तणावपूर्ण आहे. जाफराबाद आणि सजूरमोर परिसरात मोठ्या प्रमाणावर हल्ले, तोडफोड, आगजनी आणि दुकानांमध्ये लूट झाली. पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी अश्रुधूर आणि लाठीचार्ज केल्यानंतरही जमाव हटला नाही, त्यामुळे चार गोळ्या झाडल्या गेल्या, अशी माहिती जावेद शमीम यांनी दिली. हिंसाचारात १३ पोलीस कर्मचारी आणि २ नागरिक जखमी झाले असून, एक युवक गोळी लागून मरण पावला आहे.

परिस्थिती हाताळण्यासाठी बांग्लादेश सीमेला लागून असलेल्या भागात इङ्क्ष ची तैनाती करण्यात आली आहे. धारा १६३ अंतर्गत कर्फ्यू लागू करण्यात आला असून, इंटरनेट सेवा बंद केली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लोकांना संयम बाळगण्याचे आवाहन करत सांगितले की, धर्माच्या नावाखाली अधार्मिक कृती करू नका, समाजात फुट पाडणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई होईल. त्यांनी पुन्हा स्पष्ट केलं की राज्य सरकार वक्फ (सुधारणा) कायद्याला पाठिंबा देत नाही आणि तो बंगालमध्ये लागू होणार नाही. विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी न्यायालयाचा आदेश 'लोकशक्तीचा विजय' असल्याचे म्हटले आणि राज्य सरकारवर आरोप करत म्हणाले की, BSF तैनात असतानाही जिल्हाधिकारी गप्प का बसला?

DGP राजीव कुमार यांनी सांगितले की, हिंसाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि अफवांवर विश्वास ठेवू नये. वरिष्ठ पोलीस अधिकारी परिस्थितीवर बारकाईने नजर ठेवून आहेत.

### नीलम गो-हे यांची मुख्यमंत्र्यांकडे अवैध बालगृहे तपासणी मोहिमेची मागणी

मुंबई, १३ एप्रिल : ठाणे जिल्ह्यातील खडवली येथील 'पसायदान' नावाच्या संस्थेत लहान मुलांवर कथित लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणावरून महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणात संबंधित संस्थेतील काही पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, झजउडज कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. बालकांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे असा दावा करणाऱ्या संस्थेकडून घोर दुर्लक्ष झाल्याने पीडित मुलांवर मानसिक व शारीरिक अत्याचार झाले, असे उपसभापतींनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

## वक्फ कायद्यांतर्गत अनधिकृत मदरसा पाडला

पन्ना : वक्फ कायदा लागू झाल्यानंतरची पहिली कारवाई मध्य प्रदेशमधील पन्ना जिल्ह्यात करण्यात आली. पन्ना जिल्ह्यात असलेला एक अनधिकृत मदरसा पाडण्यात आला. पन्ना जिल्ह्यातील बीडी कॉलनी येथे सरकारच्या जागेवर हा अनधिकृत मदरसा मागील ३० वर्षांपासून होता. अखेर वक्फ कायदा झाल्यानंतर हा अनधिकृत मदरसा पाडण्यात आला.



मदरशाला अनधिकृत असल्यामुळे काही वर्षांपूर्वी नोटीस बजावण्यात आली होती. पण नंतर कोणतीही कारवाई झाली नव्हती. अखेर आता वक्फ कायदा झाल्यानंतर हा अनधिकृत मदरसा पाडण्यात आला. आधी ग्रामपंचायत होती त्यावेळी सरकारी जमिनीवर अनधिकृतरित्या बांधलेल्या मदरशाला परवानगी मिळाली नव्हती. नंतर महापालिका झाली त्यावेळीही मदरशाला परवानगी मिळाली नव्हती. यामुळेच अनधिकृत मदरशाला नोटीस बजावली होती. अखेर आता हा अनधिकृत मदरसा पाडण्यात आला.






## नॅशनल हेराल्ड प्रकरणी 'ईडी'कडून ७०० कोटींची मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू




नवी दिल्ली : सक्तवसुली संचालनालयाने नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि त्यांचे पुत्र लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी अडचणीत आले आहेत. त्यांच्याशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीच्या ७०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तेचा ताबा घेण्याची प्रक्रिया ईडीने शनिवारी सुरू केली आहे.

या मालमत्तांमध्ये दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील प्रमुख व महत्त्वाच्या जागांचा समावेश आहे. यामध्ये राजधानी दिल्लीतील बहादूरशहा जफर मार्गावरील हेराल्ड हाऊस या प्रतिष्ठित इमारताचीही समावेश आहे.

ईडीने सांगितले की, ही कारवाई एजेएल मनी लॉन्डरिंग प्रकरणाच्या अनुषंगाने केली जात आहे. ही प्रक्रिया प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट (पीएमएलए) २००२ च्या कलम ८ आणि मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक (जप्त केलेल्या किंवा गोठवलेल्या मालमत्तेचा ताबा घेणे) नियम २०१३ अंतर्गत करण्यात येत आहे.

नॅशनल हेराल्ड हे वर्तमानपत्र प्रकाशित करणारी कंपनी एजेएल ही यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची आहे. या कंपनीत सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स आहेत, ज्यामुळे ते मुख्य भागीदार ठरतात. यातील उर्वरीत सहभागी मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस या काँग्रेस नेत्यांचे निधन झाले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत दत्तनगर येथे १०१ घरकुलांचे भूमिपूजन

नगर : श्रीरामपूर तालुक्यातील दत्तनगर गावठाण फेज वन येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत व जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष पुढाकारातून घरकुलांच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विधिवत पूजा करण्यात आली तसेच दत्तनगर ग्रामस्थांच्या वतीने डॉ. सुजय दादांची पेढा तुला व सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. त्यांनी हा सत्कार स्वीकारून उपस्थित सर्वांशी संवाद साधला.




या कार्यक्रमात बोलताना डॉ. सुजय विखे यांनी स्पष्ट शब्दांत राजकारणाची दिशा ठरवणारे विचार मांडले. राजकारण छोट्या गोष्टींवर न होता, गरिबांना घर, शेतकऱ्यांना वीज आणि शिक्षण मिळाले पाहिजे. श्रीरामपूर बदलायच असेल तर 'तुझं-माझं' सोडून जनतेच्या हितासाठी काम करावं लागेल, असे ते म्हणाले.

तसेच ते पुढे म्हणाले की, सत्ता बदलली की काही नेते पक्ष बदलतात. परंतु गोरगरीब जनतेची सेवा केली तर जनता कधीच विसरत नाही. त्यामुळे जनतेवर विश्वास ठेवावा, पुढाऱ्यांवर नव्हे असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हा कार्यक्रम घेण्यात आल्याचा विशेष आनंद देखील त्यांनी बोलताना व्यक्त केला.

६०० घरांची घोषणा - सोलर युक्त घरकुलांची उभारणी

डॉ. विखेंनी जाहीर केले की, आमदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून श्रीरामपूरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ६०० नवीन घरकुलं मंजूर झाली असून, ही घरं सोलर सिस्टिमसह उभारण्यात येणार आहेत. यामध्ये दत्तनगर हे एकत्रित केंद्र असणार आहे.

गुन्हेगारी प्रवृत्तीला थारा नव्हे, धक्का - कडक इशारा

शहरातील वाढती गुन्हेगारी, चेन स्नॅचिंग, खंडणी व महिलांवरील अत्याचार यावर भाष्य करताना डॉ. विखे म्हणाले, कोणताही समाज असो, गुन्हेगारी प्रवृत्तीला समर्थन देणार नाही. अशांना उखडून फेकलं जाईल. श्रीरामपूरच्या कायदा व सुव्यवस्थेवर कठोर पावले उचलण्याचा इशाराही त्यांनी दिला.

महामानवांची जयंती - डीजे नव्हे, उपक्रमातून साजरी करा

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले की, महामानवांच्या जयंतीत डीजे किंवा अनावश्यक खर्च न करता आरोग्य शिबिर, समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले पाहिजे. विचारांशी नातं जोडण्याचा खरा मार्ग तोच आहे.

पद माणसामुळे मोठं होतं, पदामुळे माणूस नव्हे

जनतेची कामं करा, जनता आपल्याला नेता बनवते. त्यासाठी कोणत्याही शिफारशीची गरज नसते, असा मार्मिक सल्ला देखील सुजय विखेंनी संभाव्य नगरसेवकांना दिला.

श्रीरामपूरसाठी ही सुरुवात आहे; आता मी इथे सातत्याने येणार!

कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी ही फक्त सुरुवात आहे, श्रीरामपूरला आता मी वारंवार भेट देणार आहे. सर्वांनी एकत्र येऊन विकासात्मक दृष्टीने काम करूया, असं देखील मत मांडून विकासाला प्राधान्य देण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दीपक अण्णा पठारे, नानासाहेब शिंदे, शरद नवले, गणेश गुदगुले, अभिषेक खंडागळे, सुरेंद्र थोरात, सारिका ताई, संगीता शिंदे, गिरधर अलके, भीमा बागूल तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे : राधाकृष्ण विखे-पाटील

अहिल्यानगर दि. १३- जलसंपदा विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाशी सर्व यंत्रणा, नागरिक, शेतकरी व अन्य घटक जोडले गेले आहेत. त्यामुळे जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज दिल्या.



जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२५ कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. यावेळी जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजीव टाटू उपस्थित होते. बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.

मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले, या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जावा. लोकाभिमुख कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागाची वेगळी ओळख निर्माण झाली पाहिजे या पद्धतीने जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात यावेत. सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे होण्यासाठी कालवे प्रवाही राहणे अत्यंत महत्त्वाचे आहेत. कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा मध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यास प्राधान्य देण्यात यावे. या कामात स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी.

कालवे स्वच्छ आणि प्रवाही राहिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन शेवटच्या घटकाला पाणी उपलब्ध होईल आणि त्यामुळे जनसामान्यात शासनाची प्रतिमा उंचावेल. या कामात स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांचाही सहभाग घेऊन जलव्यवस्थापनाच्या प्रक्रियेला गती देण्यात यावी. तसेच कालव्यांवरील अतिक्रमणे काढण्यासही प्राधान्य देण्यात यावे.

जलसंपदा विभागाच्या ताब्यात असणाऱ्या मालमत्तांची मोजणी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. या जागांची ७/१२ वर नोंदणी करून घ्यावी. यासाठी क्शन प्लॅन करण्यात यावा. जलसंपदा विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या जागेवरील अतिक्रम काढण्यासाठी मोहीम स्वरूपात काम करावे. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पाणी वापर ठरला असून त्यानुसार पाणी वापराचे ऑडिट करून घ्यावे. पाण्याची गळती रोखण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका आणि आणि क्षेत्रीस्तरावर उपाययोजना राबविण्यात याव्यात.

'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' मध्ये जलसंपदा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, शेतकरी, पाणी वापर संस्था संवाद, थकीत पाणीपट्टी वसुली, जल व्यवस्थापनासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग, अनधिकृतपणे पाणी वापर रोखणे, सांडपाण्याचा पुनर्वापर या विषयांनाही प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचनाही जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील यांनी दिल्या.

'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' जिल्ह्यात यशस्वीपणे राबवा- जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नागरिकांना पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देण्याबरोबरच जलसाक्षरता वाढविण्यासाठी १५ ते ३० एप्रिल दरम्यान जिल्ह्यात 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'यशस्वीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' पूर्वतयारीच्या राज्यस्तरीय आढाव्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' मध्ये जिल्ह्यातील कालव्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवडीची मोहिम यानिमित्ताने हाती घेण्यात यावी. जिल्ह्यातील उद्धवातून अनाधिकृतपणे पाणी उपशाबाबत माहिती घेण्यात यावी. जलसाठ्यांच्याभोवतीचे प्रदुषण कमी करण्याच्यादृष्टीनेही आवश्यक ती कार्यवाही करावी. पंधरवड्याच्या माध्यमातून पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनमानसांमध्ये विविध माध्यमांद्वारे व्यापक स्वरुपात जागृती करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

### हल्लेखोर वाघिणीचे तीन बछडे वनविभागाच्या ताब्यात

चंद्रपूर, १३ एप्रिल - चिचपल्ली वनपरिक्षेत्रातून तीन दिवसांपूर्वी जेरबंद करण्यात आलेल्या हल्लेखोर वाघिणीचे दुरावलेले तीन बछडे अखेर वनविभागाच्या हाताला लागले आहे. मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास उमा नदीच्या परिसरातून या तीन बछडे बेशुद्ध करून सुरक्षितरीत्या पकडण्यात आले.

हल्लेखोर वाघीण बुधवारी (ता. १०) जेरबंद करण्यात आली होती. तिने चंद्रपूर जिल्ह्यातील चितेगाव व मूल परिसरात नऊ महिन्यात चार जणांचा बळी व तीन जणांना जखमी केले होते.




धाराशिव
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जय हनुमान नगर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

येथील जय हनुमान नगर आणि मस्के प्लॉटिंग परिसरात हनुमान जयंतीच्या निमित्ताने मागील २ ते ३ वर्षापासून अखंडपणे सुरू असलेल्या या उत्सव समितीच्या आयोजकांनी हनुमान जयंतीच्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.१२ एप्रिल रोजी आयोजित केला आहे.

याशिवाय सात दिवस काकड आरती, विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, सावता महाराज चरित्र पठण, हरिपाठ, हरीकिर्तन, जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासाठी प्रमुख व्यासपीठ म्हणून हभप. अंगद शिवराम महाराज ढेरे तसेचे हभप. रामभाऊ गोरे मामा महाराज यांची उपस्थिती लाभणार आहे.

भारुडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय एकात्मतेची झलक दाखवितात.

यंदा मात्र मोठ्या प्रमाणावर कीर्तन सोहळा होत असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मेघना साकुरे यांचा भाजपच्या वतीने सत्कार

**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्याच्या ऊर्जा आरोग्य, महीला व बालकल्याण व एम एस आरडीसी राज्य मंत्री मेघनाताई साकुरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त ११ एप्रिल शुक्रवार रोजी परभणी येथे त्यांच्या निवासस्थानी तुळजापूर तालुका भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी भेटून आई तुळजाभवानी मातेची कवड्याची माळ व देवीची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपाचे गुलचंद व्यवहारे, राजाभाऊ मलबा, सागर पारडे अभिषेक पवार उपस्थित होते.



### लोहारा येथे ई-श्रम कार्ड शिबिर संपन्न

**लोहारा, दि.१३ एप्रिल -**

लोहारा शहरासह परिसरातील सर्व असंघटित काम गारांसाठी ई-श्रम कार्ड काढण्यासाठी लोहारा शहरात जिल्हा कामगार कार्यालय कम्पचे आयोजन करण्यात आले होते. दि.१० ते १२ एप्रिलपर्यंत ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रम कार्ड काढण्यासाठी सुरळीत व जास्तीत जास्त कामगारांच्या नोदी व्हाव्यात या उद्देशाने शहरातील ओम कोरे व नगरसेविका आरती ओम कोरे यांनी जनजागृती करून व विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. या शिबिराच्या माध्यमातून खाजगी नोकरदार, मजूर, ड्रायव्हर, फळ विक्रते, शेतमजूर, डिलिव्हरी बॉय, टेलर, बांधकाम कामगार व विविध रोजगार करणारे असंघटित कामगार यांना हे श्रम कार्ड मिळणार आहे.

### श्वेता परदेशी यांन राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**



तालुक्यातील बारूळ येथील मिसेस इंडिया विजेत्या आणि इंटरनॅशनल सेलिब्रेटी श्वेता परदेशी यांना एमडी फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय गौरव पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला असून २० एप्रिल रोजी सोलापूर येथे होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच शिवराज्य बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ प्रेरणा शिखर आयकॉन अवॉर्ड पुरस्कार देखील त्यांना जाहीर झाला असून अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे होणाऱ्या कार्यक्रमात श्वेता परदेशी यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.



### महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**तेर, दि.१३ एप्रिल -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील अंगणवाडी क्र.५२२ मध्ये महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच पारधी वस्ती मधील ज्या माता आपली मुले अंगणवाडीमध्ये पाठवतात त्या मातांचा सत्कार केला. तसेच अंगणवाडी मध्ये ECCE Day साजरा करण्यात आला. मुलांचा बौद्धिक विकास या विषयावर मातांना माहीती दिली. यावेळी जोशीला लोमटे, अंगणवाडी कार्यकर्ती प्रभावती वाघमारे, मदतनिस रेणुका शिंदे आणि माता व बालक उपस्थित होते.

खराब रस्त्यामुळे भाविकांना होतंय त्रास... रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांत संताप...

# येडेश्वरी यात्रेनिमित्त कडकनाथवाडी, बार्शी रस्त्यावर वाहनांची गर्दी

**रस्त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना आई येडेश्वरी दूरदृष्टी देवो, बुद्दी देवो... भाविकांनी केली प्रार्थना...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथील आराध्य दैवत श्री येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रोत्सव दि.१२ एप्रिल रोजी प्रारंभ झाला आहे. तुळजाभवानी मातेची धाकटी बहीण म्हणून येडेश्वरी देवीची ओळख आहे.

राज्यासह परराज्यातील लाखो भाविक देवीच्या यात्रेसाठी येरमाळा येथे येत आहेत. यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले, असून यात्रेसाठी येणाऱ्या वाहनांची वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून मोठे नियोजन करण्यात आले आहे.

येरमाळा गावाकडे येणाऱ्या मुख्य रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या असल्याने मुंबई, पुण्याकडील भाविकांनी बार्शी-कडकनाथवाडी, तेरखेडा मार्गाने येडेश्वरी देवीच्या पालखी दर्शनासाठी येरमळा गाव गाठले. दोन जिल्ह्यातील अनेक गावाला जोडणारा महत्वाचा आणि





जवळचा मार्ग असल्याने भाविकांची मोठी गर्दी या रस्त्याने वाढली आहे. परंतु रस्ता प्रचंड खराब असल्याने भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

गेले अनेक वर्षे झाली रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून अपघात देखील घडत आहेत. स्थानिक नागरिकांनी रस्त्याबाबत तक्रारी केल्या आहेत.

तरीही संबंधित विभागाचे रस्त्याकडे दुर्लक्ष आहे. रस्त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना आई येडेश्वरी दूरदृष्टी देवो, बुद्दी देवो अशी प्रार्थना भाविकांनी केली आहे.

# परंडा शहरात चार दिवसांपासून पाणी पुरवठा बंद

**नागरिक त्रस्त...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ एप्रिल -**

परंडा शहरातील नागरिक गेल्या चार दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत. शहरात पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प झाल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागत आहे.

यापूर्वी परंडा शहराला खासापुरी आणि सीना जकवेल या दोन स्रोतांमधून पाणीपुरवठा करण्यात येत होता. परंतु शासनाच्या नव्या योजनेंतर्गत सीना कोळेगाव धरणावरून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. त्यानंतर जुन्या स्रोतांकडे नगर परिषदेने दुर्लक्ष केल्याने आज शहरात पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.



शहरात असलेले हातपंपही बंद अवस्थेत असून, त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. तसेच, पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाक्यांची नियमित स्वच्छता आणि देखभालही केली जात नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत.

सीना कोळेगाव प्रकल्पात भरपूर पाणी असतानाही दर तीन-चार दिवसांनीच अपुरा पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या कडाक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कमीत कमी एक दिवसा आड तरी नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

पाणीपुरवठा करणारी मोटार जळाल्यामुळे सध्या पाणीपुरवठा खंडित झाल्याचे समजते. अशा समस्या पुन्हा उद्भवू नयेत म्हणून जुन्या पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणा कार्यान्वित ठेवाव्यात, तसेच बंद अवस्थेतील हातपंपांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## रामभाऊ लगाडे यांना सन्मानपत्र



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ एप्रिल -**

महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्रमिक मानव अधिकार संघ व मराठवाडा गायरान वन वहतीदार जनसंस च्या वतीने ११ मार्च रोजी सन्मानित करण्यात आले आहे. रामभाऊ लगाडे जाणीव संघटना वाशी जिल्हा अध्यक्ष धाराशिव त्यांनी केलेल्या नव समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी गायरान जमिनी नावावर करण्यासाठी लढा लढला व लढत आहेत.

त्यांनी महिला मुले शिक्षण रोजगार आरोग्य यावर खूप मोठे मोलाचे काम केले आहे. त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे त्यांना मराठवाडास्तरीय गायरान वन जमिनी सत्याग्रह आंदोलनामध्ये भाग घेऊन मोलाचे मार्गदर्शन केले म्हणून भाई बजरंग ताटे मानव अधिकार रक्षक श्रमिक मानव अधिकार संघ मराठवाडा गायरान वन वहिती धारक जनसंसदच्या वतीने सन्मान देऊन त्यांचा गौरव व सन्मान करण्यात आला.

त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत धानुरीत जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ एप्रिल -**

लोहारा तालुक्यातील धानुरी येथे महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र अंतर्गत महिलांसाठी आर्थिक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ह्या कार्यक्रमाचे आयोजन नागनाथ लाड यांच्या घरात घेण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शन श्री. सद्गुरू बबनजी महाराज (उंडरगांवकर) यांच्या उपस्थितीत उपस्थितीत करण्यात आला व यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री संत मारुती महाराज महिला बचत गटातील महिला ह्या होत्या व तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कविता संदीपान बनकर, या होत्या. यावेळी संचालनाची जबाबदारी शिवहरी सूर्यवंशी, यांनी उत्तमरित्या पार पाडली. या कार्यक्रमाचे आभार ज्ञानेश्वर झाडके यांनी मानले या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना स्वयं-सहायता गट, बचत-गटांचे फायदे, सूक्ष्म अर्थसहाय्य आणि आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.

## डॉ. विक्रमसिंह माने यांची एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल सदस्यपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणारे (रायगड) येथील एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल सदस्यपदी निवड झाली. या निवडीबद्दल तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार व ट्रस्टचे विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, अध्यक्ष नेताजी पाटील, गणेश भातलवंडे, डॉ. दिगंबर दाते, डॉ. उषा वडणे, डॉ. प्रीती माने आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. माने यांनी ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित केले असून, ७ वर्षांहून अधिक काळ प्लेसमेंट व प्रशिक्षण अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी ४००० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन केले असून, संशोधनाच्या माध्यम ातून कास्टिंग उद्योगातील दोष ७० टक्क्याने कमी करण्यास मदत केली आहे.

तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र, कृषी ड्रोन ट्रेनिंग सेंटर, रेडिओ सेंटर आणि चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे विश्वस्त, शिक्षक, व उद्योजकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.




### नारंगवाडीत हनुमान जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी च्या वाडीमध्ये हनुमान मंदिरात हनुमान जयंती ग्रुपच्या वतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. जन्मोत्सव निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाने भक्तीमय वातावरणात व उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रतिवर्षा प्रमाणे हनुमान जयंती ग्रुप व हनुमान भक्त यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक हनुमान मंदिरात हनुमान जन्म ोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिरात हनुमानाच्या मूर्तीची अभिषेक महापूजा करण्यात आली. त्यानंतर गुलाल उधळून जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. लखन जाधव यांच्या हस्ते म हाप्रसादाचे नैवेद्य दाखवण्यात आले. तसेच विठ्ठल-रुक्मिणी, महादेव मूर्ती, शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून नैवेद्य दाखवून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यासाठी हनुमान जयंती ग्रुपचे अध्यक्ष अंकुश भोसले, अमोल सुरवसे, व्यंकट सुरवसे, लखन जाधव, ओम जाधव यांनी परिश्रम घेतले.

# सरपंचपदाचे आरक्षण जाहीर होणार; गावपुढाऱ्यांचे आरक्षणावर लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१३ एप्रिल -**

राजकीय वार्ता... मेघराज किलजे, जळकोट, ता. तुळजापूर

आगामी काळात होऊ घातलेल्या तुळजापूर तालुक्यातील १०८ ग्राम पंचायतमधील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होणार आहे. तुळजापूर तालुक्यातील गावागावातील गाव पुढाऱ्यांचे या आरक्षणावर लक्ष लागून राहिले आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना या आरक्षणानंतर राजकीय रणनिती आखावी लागणार आहे. राजकीय समीकरणे कशी असणार आहेत. हे आरक्षणानंतर कळणार आहे.




तुळजापूर तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाने तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्या सहीने जाहीर सुचनेचे पत्रक प्रसिद्ध झाले आहे. त्या अनुषंगाने तुळजापूर तालुक्यातील १०८ ग्रामपंचायतमधील सरपंचाची पदे सन २०२५ ते २०३० या पाच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण या प्रवर्गातील महिला आरक्षण काढण्याची प्रक्रिया दि.१६ एप्रिल २५ (बुधवार) रोजी सकाळी ११ वा. तुळजापूर येथील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय स्पोर्ट्स हॉल या ठिकाणी हे आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

सध्या कडक उन्हाचा तडाखा बसत आहे. या तडाख्यात गावचा कारभारी जाहीर होणार असल्याने, राजकीय वातावरण तापणार आहे. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीनंतर गाव पातळीवरील अत्यंत संघर्षशील असणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीचा आखाडा सरपंचपद जाहीर झाल्यानंतर पेटणार आहे. गावच्या गटातटातील राजकारण पुन्हा एकदा उफाळून येणार आहे. तुळजापूर तालुक्यातील १०८ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांना आतापासूनच वेध लागले आहेत. प्रत्येक गाव पुढाऱ्यांचे या आरक्षणावर लक्ष लागून राहिले आहे. आपल्या गावाला आरक्षण कोणते पडणार आहे. याची काळजी आत्तापासूनच लागली आहे. निसर्गाच्या वातावरणात चैत्र पालवी फुटल्याने सर्वत्र हिरवेगार दिसत असताना, प्रत्येक गावच्या राजकीय पक्षांचे रंग वेगवेगळे राहणार आहेत. तुळजापूर तालुक्यातील महत्वपूर्ण गावे या आरक्षणात असल्याने गावागावात राजकीय पालवी फुटणार आहे. सध्या तुळजापूर तालुक्याच्या राजकारणावर भाजपाचा प्रभाव आहे. विविध संस्थावर भाजपाचेच वर्चस्व आहे. सर्वच गावात भाजपा स्वतंत्रपणे लढण्याचे स्पष्ट चित्र आहे. तर गाव पातळीवर भाजपा बरोबर कुठला पक्ष सोबत येणार आहे. हाही विषय येत्या काळात स्पष्ट होणार आहे. कॉंग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही सेना, मनसे, मित्रमंडळे आदि पक्षातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व गावागावातील गाव पुढारी कशी कशी रणनिती आगामी काळात आखतात. हे मात्र आश्चर्यकारक आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर काही प्रमाणात राजकीय वातावरण थंड झाले होते. परत ग्राम पंचायत निवडणुकीच्या आखाड्यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा पेट घेणार आहे. तुळजापूर तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांना आतापासूनच वेध लागले आहेत. प्रत्येक गाव पुढाऱ्यांचे या आरक्षणावर लक्ष लागून राहिले आहे. १०८ ग्राम पंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण कसे असेल? यासाठी मात्र गावा-गावातील कार्यकर्त्यांना बुधवार पर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

## बी सी जी लसीकरण व टी बी मुक्त भारत यासाठी पोरगाव येथे आरोग्य जनजागृती



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ एप्रिल आज दि.  जिल्हा परिषद केंद्र बालानगर अंतर्गत दि ११ एप्रिल रोजी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र पोरगाव आणि ह्यूमना पिपल टु पिपल इंडीया संस्था अंतर्गत निरामया प्रोजेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्रशाला पोरगाव यांच्या सहभागातून,टी बी या आजाराची माहिती व रवश्रींी इउक्ष लसीकरण याबाबत जनजागृती हेतू शालेय विद्यार्थी च्या माध्यमातून गावामधून रॅली काढण्यात आली तसेच उपस्थित नागरिकांना प्रोजेक्ट लीडर शंकरलाल गुर्जर यांनी शालेय विद्यार्थीना टी बी विषयी मार्गदर्शन करण्यात आले.सदरील कार्यक्रमाचे वरिष्ठ शिक्षक अधिकारी आणि आशा ताई यांनी नियोजन केले,तसेच,ह्यूमना संस्थे चे प्रोजेक्ट लीडर शंकरलाल गुर्जर, पब्लिक हेल्थ स्पेसलिस्ट डॉ भार्गव देशपांडे व मनीषा खवाटे, आरती सुर्वे , रिमा गरुड यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी, आरोग्य सेवक बाळासाहेब कवचट आशा वर्कर उपस्थित होते.तसेच यावेळी क्षयरुग्णांना न्यूट्रीशन किट पोरगाव ग्रामपंचायत सरपंच प्रभु नीळ,उपसरपंच बिहारीलाल राठोड,ग्रामपंचायत अधिकारी इंगोले व्ही व्ही आणि आरोग्य निरीक्षक सचिन कुलथे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

## पैठण पोलिसांचा रूट मार्च.

तभा वृत्तसेवा पैठण दि १३ :- विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने शहरात कायदा सुव्यवस्था अबाधीत रहावी तसेच गैरकृत्य करण्याचा ईरादा ठेवत असलेल्यांना चपराक मिळावी यासाठी रविवारी दुपारी १२ वाजता उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या उपस्थितीत पैठण पोलिसांनी विशेष दस्त्यासह शहरात रूट मार्च केला.



पॉवर हाऊस बौद्ध विहार पासून रूट मार्च सुरू करण्यात आला नेहरू चौक, ग्रीन चौक, भाजी मार्केट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सराफा मार्केट, बस स्थानक चौक ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच नागरी वस्तीतून हा रूट मार्च घेण्यात आला रूट मार्च करिता ०२ अधिकारी १३ पोलीस अंमलदार १७ होमगार्ड उपस्थित होते. तसेच या रूट मार्च निरीक्षण ड्रोनद्वारे करण्यात आले.जयंती उत्सवासाठी पोलिसांचे विशेष बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी दिली.

## आमदार अब्दुल सत्तार यांचा भैरवनाथ मंदिर समितीच्या वतीने सत्कार




सोयगाव,दि.१३ एप्रिल - तालुक्याचे आराध्य दैवत श्री.भैरवनाथ महाराज यात्रा महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली.श्री.भैरवनाथ यात्रा उत्सवानिमित्त आमदार अब्दुल सत्तार यांनी यात्रेला सदिच्छा भेट दिली.याप्रसंगी श्री.भैरवनाथ महाराज संस्थानच्या वतीने आ.अब्दुल सत्तार यांचा सत्कार करण्यात आला.आ.अब्दुल सत्तार यांनी मंदिर परिसरात भाविकांशी संवाद साधत शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,कृउबा समितीचे सभापती केशवराव तायडे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,गोपीचंद जाधव,अक्षय काळे,संतोष बोडखे,दिलीप बिर्ला,रवींद्र काळे,राजू जावळे,कुणाल राजपूत,कदीर शहा,हर्षल काळे,अशोक खेडकर,दिलीप देसाई,ड.योगेश पाटील,राजू दुत्तोंडे,रमेश गव्हांडे,सुरेश चव्हाण,श्रावण जाधव,रमेश भंगी तसेच सोयगाव परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संताजी महाराज जगनाडे मंदिर व तेली समाज सभागृह परिसरात संरक्षण भिंती करिता निधी उपलब्ध करण्याची मागणी



सोयगाव दि.१३ एप्रिल : येथील श्री संताजी महाराज जगनाडे मंदिर व तेली समाज सभागृह परिसरात संरक्षण भिंती करिता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार डॉ.कल्याण काळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सोयगाव-गलवाडा रोडवर श्री संताजी महाराज,श्री कडोजी महाराज यांचे मंदिर काम तसेच तेली समाज सामाजिक सभागृहाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.त्या परिसराला संरक्षण भिंतीची गरज असून त्याकामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.यासाठी रविवार दि.१३ रोजी तेली समाजाच्या वतीने खासदार डॉ.कल्याण काळे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.तेली समाजाचे अध्यक्ष राजू दुतोंडे,सचिव मंगेश सोहनी,उपाध्यक्ष कैलास पंडित,सुधाकर सोहनी,कृषिभूषण अरुण सोहनी,गणेश क्षीरसागर आदींनी हे निवेदन दिले.यावेळी सोयगाव काँग्रेस तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे,माजी आमदार नामदेव पवार, रवींद्र काळे,दिलीप मंचे,दिनेश हजारी,डॉ. इंद्रसिंग सोळुंके, रवींद्र काटोले,आदी उपस्थित होते.

## बिडकीन पोलीसांचे पथसंचलन



बिडकीन दि १३ एप्रिल महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड व अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह मॅडम,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे यांच्या आदेशाने बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दि १२ एप्रिल रोजी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, या प्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी मार्गदर्शन प्रसंगी सांगितले की महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शांततेत व उत्साहात साजरी करावी, तसेच मिरवणुकीच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू देऊ नये, सर्वांनी नियमाचे पालन करावे, असे अनेक सूचना या बैठकीमध्ये बोलताना सांगितले,आज दि.१३ रोजी सायंकाळी बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील गावात तसेच बिडकीन मध्ये पथसंचलन करण्यात आले, यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, अशोक सोकटकर, अप्पासाहेब माळी,एस एस कदम,संजय चव्हाण, हनुमान धनवे, संदीप धनेधर,मगर, योगेश नाडे, दिलीप साळवे, सुरक्षा दल, होमगार्ड, आदी पोलीस कर्मचारी सहभागी होते.

# समाजातील शेवटच्या माणसांसाठी काम करणे हीच खरी पत्रकारिता : अभिजीत कांबळे

### एमजीएममध्ये 'इन कन्वरसेशन विथ अ न्यूजरूम लीडर' विषयवार संवाद सत्र संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ : आपल्याला चांगला पत्रकार व्हायचे असेल तर ज्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहचत नाही अशा 'व्हाईस ऑफ दि व्हाईसलेस' व्यक्तींसाठी काम केले पाहिजे. विशेषत: समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी आपल्याला काय करता येईल, या जाणीवेसह पत्रकारिता काम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन वरिष्ठ पत्रकार तथा बीबीसी मराठीचे संपादक अभिजीत कांबळे यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कॅम्युनिकेशन, कल्चर आणि मिडियाच्या वतीने 'इन कन्वरसेशन विथ अ न्यूजरूम लीडर' या विषयावर विनोबा भावे सभागृह येथे ज्येष्ठ पत्रकार तथा बीबीसी मराठीचे संपादक अभिजीत कांबळे यांच्या संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, संपादक श्री. कांबळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी प्राचार्या डॉ. रेखा शेळके, प्रा.आशा देशपांडे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.



पुढे बोलताना वरिष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे म्हणाले, न्यूजरूम लीडर म्हणून काम करताना न्यूज रूममधील विविधता कशी असेल, याला महत्व असते. आणि महाराष्ट्राच्या न्यूजरूममध्ये ही विविधता निर्माण करण्यामध्ये एमजीएम विद्यापीठातील पत्रकारिता महाविद्यालयाचा महत्वपूर्ण वाटा राहिलेला आहे. हे महाविद्यालय अत्यंत प्रयोगशील असून येथून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात काम करत आहेत.

डिजिटल माध्यमांचे महत्व वाढत असून हे भविष्य आहे. माध्यमांचे लोकशाहीकरण करण्याचे काम डिजिटल माध्यमांनी केले आहे. डिजिटलमुळे आज स्वतंत्र पत्रकार म्हणून कोणीही काम करू शकतो. या माध्यमात काम करत असताना काही कौशल्ये आपल्याकडे असणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांविषयी आपण सजग असायला हवे, अल्गोरिदम आणि तंत्रज्ञानाची माहिती असणे, बातमीची भाषा संवाद साधणारी असणे आणि व्हिडिओसाठी स्क्रिप्ट लिहिताना पाहणाऱ्याला त्यामध्ये गुंतवून ठेवता यायला हवे; अशा विविध कौशल्यांचा समावेश होतो असे वरिष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना वरिष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे म्हणाले, आज चांगली पत्रकारिता करण्यासाठी आपण तांत्रिकदृष्ट्या साक्षर असायला हवे. पत्रकारितेत काम करत असताना आपली आवड महत्त्वाची आहे मात्र, ही आवड जोपासत असताना आपले वाचन चौफेर पाहिजे, दररोज वर्तमानपत्र वाचले पाहिजे, मासिके वाचली पाहिजेत, आपल्या विषयाशी निगडित माहितीपट आणि चित्रपट पाहिले पाहिजेत. या क्षेत्रात आपल्या ज्ञानाला महत्व असून यातूनच आपली प्रगती होत असते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भविष्यात वाढणार असून पत्रकारिता क्षेत्रासाठी हे एक आव्हान असणार आहे. यामुळे येत्या काळामध्ये नोकऱ्या जावू शकतात. अशावेळी जे एआय करू शकत नाही ते आपल्याला यायला हवे. उदाहरणार्थ एआय भाषांतर करू शकतो मात्र, त्यात भाषेचा गोडवा असणार नाही. त्यामुळे आपले लिखाण उत्तम असले पाहिजे.

## रामनगर येथे प्रभू श्रीराम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ :- पैठण शहरातील रामनगर येथे श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान (राम पंचायतन) मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या उपस्थितीत पार पडला. यानिमित्त शहरातून सवाद्य, भजनी मंडळ यांच्या समवेत भव्य शोभायात्रारामनगर-यशवंतनगर-इंदिरानगर-अन्नपूर्णानगर-भवानीनगर-नाथ हायस्कुल-छत्रपती शिवाजी महाराज चौक-मेनरोड-कोर्ट रोड-यशवंतनगर-बालाजी विहार-रामनगर या मार्गे काढण्यात आली.

वेद पुरोहित श्री.वे.शा.सं. योगेश प्रभाकर चक्रे (राजु देवा) यांच्या मार्गदर्शनात मुर्ती प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली.या निमित्त ह.भ.प.श्री. कैलास महाराज पंडीत (छत्रपती संभाजीनगर) यांचे हरिकिर्तन झाले. महाआरती नंतर श्रीराम भक्तांनी या सुवर्ण सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.




या सोहळ्यास यजमान प्रकाश पानगे,भीमराव गोरे, मनोहर नवले,शरद थोटे,शिवाजी चव्हाण, श्रीकांत हाके, सुनिल लखोटिया, बबनराव शिंदे आदींच्या शुभहस्ते पूजन करत प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी,माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, दत्ता गोर्डे, अनिल घोडके, बाळू माने,बद्रीनारायण लखोटिया, चेतन कासलीवाल, शिरीष नेऊरगावकर, जयकिशन लखोटिया,श्रीराम लोळगे,नाथ प्रतिष्ठाणचे संस्थापक किशोर तावरे,शहराध्यक्ष जितू परदेशी,सतिश पल्लोड, कुणाल खताडे,, विजय मुळे, सतिश उदावंत, बंटी धुपे,बंडू आंधळे, मित्र परिवार ,आकाश आमलेकर आदी चे सहकार्य व उपस्थिती लाभली .

कार्यक्रम यशस्वीतेसाठी - रामनगर, यशवंतनगर, इंदिरानगर,नाथविहार सह पैठण परिसरातील समस्त रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित व योगदान मोलाचे ठरले .

## श्री. म्हसोबा महाराज यात्रा उत्सव समिती कार्यकारणी जाहीर

सिल्लोड (प्रतिनिधी) : सिल्लोडचे आराध्य दैवत श्री. म्हसोबा महाराज यात्रा महोत्सव येत्या १८ एप्रिल पासून सुरू होत आहे. त्याअनुषंगाने श्री. म्हसोबा महाराज मंदिरात नुकतीच समस्त गावकऱ्यांच्या उपस्थितीत यात्रा उत्सव समितीची कार्यकारणी निवडण्यात आली. अध्यक्षपदी नंदकिशोर सहारे, स्वागताध्यक्षपदी



अब्दुल समीर, कार्याध्यक्षपदी राजेंद्र बन्सोड, पांडुरंग डवणे महासचिव पदी प्रताप प्रशाद, सुदर्शन अग्रवाल, लखन ठाकूर, ज्ञानेश्वर कुदळ, सचिवपदी बाबुराव वाकडे, पांडुरंग दुधे, कृष्णा वाघ, मंजितराव भाग्यवंत , मुख्य निमंत्रक पदी किशोर अग्रवाल, अशोक बन्सोड, सुनील प्रशाद , संतोष ठाकूर तर उपाध्यक्षपदी शिवा टोम्पे, राजू दुधे, संतोष धाडगे, दीपक वाघ, आशिष कुलकर्णी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. आमदार अब्दुल सत्तार या समितीचे मुख्य मार्गदर्शक व सल्लागार आहेत.

यात्रेत येणाऱ्या भाविकांना सोयीसुविधा मिळाव्यात व यात्रा महोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करण्यात यावा यासाठी उपाययोजना करणे, यात्रेत साजरे करण्यात येणारे पारंपारिक उत्सव विधिवत व व्यवस्थितपणे साजरे करण्याच्या अनुषंगाने विविध समित्या बैठकीत स्थापन करण्यात आल्या आहेत.

## वेताळवाडी येथे सोयगाव केंद्राची केंद्र स्तरीय शिक्षण परिषद संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ एप्रिल

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेताळवाडी येथे सोयगाव केंद्राची केंद्र स्तरीय शिक्षण परिषद पार पडली,या शिक्षण परिषदेचे अध्यक्ष स्थान सोयगाव केंद्राचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांनी भूषवले,प्रमुख अतिथी म्हणून सोयगाव केंद्राचे माजी केंद्रीय मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख फर्दापूर मोतीराम जोहरे तसेच केंद्रीय मुख्याध्यापक झागाजी पोतरे, जंगलातांडा शाळेचे मुख्याध्यापक रामदास फुसे सर, गलवाडा शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वंजारी व सोयगाव केंद्रातील जिल्हा परिषद व खाजगी शाळेचे मुख्याध्यापक इत्यादी मान्यवर लाभले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश गव्हांदे यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शफीक



शेख यांनी केले,पुढे कार्यक्रमाचे मार्गदर्शन करतांना तडवी यांनी निपुण महाराष्ट्र कार्यक्रमावर भर दिला,त्याचसोबत राहुल राठोड तसेच जाधव यांनी आपले निपुण महाराष्ट्र साठी सुरू असलेले प्रयत्न सर्वांसमोर मांडले.

आजच्या शिक्षण परिषदेमध्ये सोयगाव केंद्रातील गुणवतांचा सत्कार करण्यात आला,त्यामध्ये प्राथमिक शाळा जंगलातांडा शाळेच्या सर्व टीम चे तसेच व्हिडीओ निर्मिती स्पर्धेमध्ये पारितोषिक मिळवलेल्या स्वाती पतींगे व नितेश गव्हांदे,त्याच सोबत नवोदय परीक्षेत दोन विद्यार्थ्यांनी यश मिळवलेल्या प्राथमिक शाळा आमखेडा टीमचे, सोयगाव केंद्रातील रलींळींश स्कूल म्हणून प्रा.शा.रामजीनगर मधील सर्व टीमचे तसेच निपुण भारत अंतर्गत उत्कृष्ट सहभाग पुरस्कार फिरोज तडवी यांना मिळाल्याबद्दल सर्व गुणवतांचा फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, या शिक्षण परिषदेचे आकर्षक म्हणजे समायोजनाने बदली झालेले सोयगाव केंद्राचे माजी केंद्रीय मुख्याध्यापक तसेच सध्या फर्दापूर केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत असलेले मोतीराम जोहरे याचा निरोप समारंभ आयोजित करून सत्कार करण्यात आला होता,

सोबतच जंगला तांडा शाळेचे मुख्याध्यापक रामदास फुसे व नॅशनल प्राथ.शाळेचे मुख्याध्यापक अमोल पाटील तसेच मोतीराम जोहरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले,अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जावळे,खालिद, बिऱ्हारे,नाजनिन शेख,शालेय व्यवस्थापन समिती मराठी व उर्दू तसेच ग्रामस्थ यांचे विशेष सहकार्य लाभले.

## भैरवनाथ यात्रेत बारा गाड्या ओढीत भक्तांनी फेडले नवस

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ एप्रिल


नवस फेडण्यासाठी बारा गाड्या ओढण्याचा परंपरा असलेला शहराचे ग्रामदैवत आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बहिरोबा (भैरवनाथ) महाराजांची यात्रोत्सव शनिवारी उत्साहात पार पडली. पारंपारिक वगदा वगदी मिरवणूक व बारागाड्या ओढण्याच्या कार्यक्रमासाठी भाविकांनी गर्दी केली होती.यावेळी भैरवनाथांचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले.यात्रेनिमित्त पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

सोयगाव -पळसखेडा रस्त्यावर संपुर्ण लोण्याचा बहिरोबा (भैरवनाथ) चे प्रसिद्ध जागृत देवस्थान आहे.वर्षभर



येथे भाविक दर्शनासाठी येतात परंतु चैत्र पौर्णिमेच्या दिवशी येथे यात्रा भरते.शनिवारी (दि.१२) रोजी सकाळी पारंपारिक पद्धतीने जागृत हनुमान मंदिर जुना बाजार चौक येथून वगदा वगदी मिरवणूक काढण्यात आली.दुपारी बारा वाजता भैरवनाथांची आरती झाल्यानंतर बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला.भाविकांनी मनोकामना पूर्ण व्हावी यासाठी भैरवनाथांच्या दरबारी कबूल केलेले नवस चैत्रपौर्णिमेच्या दिवशी बारा गाड्या ओढून व भैरवनाथ महाराजांना डाळ बट्टी चा नैवद्य दाखवीत नवस फेडण्याची या यात्रोत्सव मधील परंपरा असल्याने बारा गाड्या ओढण्याची परंपरा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.दिडशे च्या जवळपास भक्तांनी मानलेले नवस फेडले. खान्देश,मराठवाडा व विदर्भातील हजारो भाविक भक्तांनी यावेळी दर्शनाचा लाभ घेतला.संस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.सस्थानचे अध्यक्ष दिलीप बिर्ला,रवींद्र काळे,राजेंद्र जावळे,राजू दुतोंडे,दत्तू अस्वार,ईश्वर गव्हांडे,अतुल परदेशी,कृष्णा पाटील,शंकर चौधरी सह यांनी दर्शनासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे संस्थानाच्या वतीने श्रीफळ देऊन सत्कार केला.भैरवनाथ संस्थान कमिटीचे सदस्य व स्वयंसेवकानी योग्यरित्या नियोजन केल्याने भाविकांनी रांगेत दर्शन घेतले. सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भैरवनाथ मंदिर परिसर व यात्रेत चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः-८९ राष्ट्रीय मार्गदर्शन

डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या मृत्यूने सारा देश हादरला. डॉक्टर मुखर्जीसारखा मोहरा बळी गेला, तरी तेव्हा काश्मीर प्रश्न सुटला नाही. काश्मीरच्या भवितव्याचा प्रश्न हा काश्मिरी लोकांचा आहे. असा युक्तिवाद पंडित नेहरूंचा होता. त्यावर श्री. गुरुजींनी प्रतिवाद केला तो असा की हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत संपूर्ण भारत एक आहे. या संपूर्ण प्रदेशावर भारतीयांचा हक्क आहे. राष्ट्र हे एका सजीव शरीराप्रमाणे असते. एकेका अवयवाचा स्वतंत्र विचार करू नका. परंतु नेहरूंनी भारतीय जवानांना काश्मीर मधून परत बोलावले व काश्मीर प्रश्न युनो (णछज) कडे सोपवून जबाबदारी झटकून मोकळे झाले. ही नेहरूंनी केलेली अक्षम्य चूक आजतागायत ७५ वर्षे आपण भोगत आहोत. त्याशिवाय आज सुद्धा ईशान्य भारताचा प्रश्न स्फोटक होऊन बसला आहे. मेघालय- मिझोराम - नागालँड आसाम- त्रिपुरा- मणिपूर- अरुणाचल प्रदेश इथे केवळ मतासाठी नेहरूंनी प्रचंड प्रमाणात इस्लामिक घुसखोरी वाढू दिली. ख्रिस्ती धर्मप्रचारकांना हिंदूंचे धर्मांतर करण्यास संमती दिली. परंतु या धोरणाचा परिणाम राष्ट्राचे संरक्षण- त्याची सांस्कृतिक एकात्मता-त्यांचे भारतमाते विषयीचेप्रेम- त्यांचा आत्मविश्वास याबाबत विपरीत होईल हे श्री गुरुजींनी वारंवार सांगितले. खाजगीत व जाहीर भाषणातून समजावले. परंतु संघ ही जर राजकीय संघटना नाही, तर राजकारणावर टीका करणे चूक आहे असा सवाल करून नेहरू श्री गुरुजींना धाक दाखवू लागले. परंतु गुरुजींनी सत्ता संपादन करणे हा संघाचा उद्देश नाही; परंतु परिस्थितीची कल्पना सर्वांना करून देणे हे संघाचे कर्तव्य आहे असे ठणकावून सांगितले. व इथेच संघाच्या विविध क्षेत्री- विविध संघटना असणे ही काळाची अपरिहार्य गरज आहे, या भूमिकेतून संघाने पुढची दमदार पाऊले टाकली.

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




## जिल्हा परीषद प्राथमिक रामजीनगर येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



सोयगाव,दि.१३ एप्रिल - नाविण्यपुर्ण व उपक्रमशिल शाळा रामजीनगर येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे,सदस्य तथा समाजसेवक राजु कुडके,शिक्षणप्रेमी तथा सदस्य योगेश बोखारे यांच्या हस्ते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी सदस्य एकनाथ इंगळे,शंकर जेठे,पालक दिलीप कळवत्रे,विशाल पवार,दिनेश काळे उपस्थित होते.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहीती दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक,सहशिक्षक,प्रशिक्षक शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

मिळकत मौजे देवळाई ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील प्लॉट नं. ४०, क्षेत्र १११.५२ चौ.मी. गंगोत्रीनगर गट नं. ८६ बाबत.

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार शोयब कदीर देशमुख, रा. सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना वासे खान पिता आरिफ खान रा. सिल्क मिल कॉलनी, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी त्यांची मिळकत मोजे देवळाई ता.जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा हद्दीतील गट नं. ८६ मधील गंगोत्रीनगरचा प्लॉट नं. ४० ज्याचे क्षेत्रफळ ३० बाय ४० म्हणजे १२०० चौ. फुट ज्याचे चौ. मी. १११.५२ होतात व नियमितीकरण दाखल्यानुसार भूखंडाचे क्षेत्र १०४.६६५ चौ. मी. प्लॉट कायमस्वरुपी विक्री करण्याचा तोंडी करार केलेला आहे.

सदरील प्लॉट नं. ४० ची चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : प्लॉट नं. ४५

पश्चिमेस : १५ फुटाचा रस्ता

दक्षिणेस : २० फुटाचा रस्ता

उत्तरेस : प्लॉट नं. ४१

सदरील मिळकत अकृषिक आदेश जा.क्र. २०२०/जमा-२/परि.४२-क/प्र.क्र.३१ दिनाक ३/३/२०२० अन्वये म.ज.म.अ.१९६६ चे कलम ४२ (क) मधील तरतुदी अन्वये अकृषिक करण्यात आलेली आहे व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा यांचेकडील परवाना क्र. २०५९/२०२१-२२, फाईल क्र. ६६९/१७.११.२१ दिनांक ३०/१२/२०२१ अन्वये नियमीत करण्यात आलेली आहे. असे वरील उल्लेखीत विक्री करणार यांनी आश्वासन दिले आहे. सदरील प्लॉट मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असुन दोषमुक्त आहे व कसल्याही प्रकारची कोणाचाही हितसंबंध नाही. असे कळविलेले आहे. येणेप्रमाणे सदर प्लॉट मिळकतीबाबत किंवा कसल्याही प्रकारचा कोणाचाही आक्षेप/उजर, हितसंबंध असेल किंवा कोणत्याही प्रकारचे व्यवहार किंवा करार, विक्री, दान, गहाण, तारण, लिज, बांध, चर्तुसिमा, सिमा हद्दी चोळी बागडी इत्यादी असल्यास किंवा कोणत्याही कारणाने आक्षेप असल्यास मिळकतीशी किंवा व्यवहाराशी असलेले हितसंबंध / आक्षेप खालील दिलेल्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (७) दिवसाच्या आत आपले आक्षेप/उजर नोंदवावा. सदरील मुदतीत कोणताही आक्षेप / उजर न आल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्विवाद व दोषमुक्त व वरील उल्लेखित मालक व्यतिरिक्त कोणताही मालकी हक्क नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर कोणताही उजर/ आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

दिनांक : ११/०४/२०२५

ठिकाण : सोयगांव

**ॲड. पी.एम चौधरी**
**कार्यालय : बस स्थानक जवळ सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद**
**मो.९११२११०३७८**


## रोखठोक

**दिनेश गुणे**

# मानवाधिकाराचे राजदूत!

दहशतवादाच्या विरोधात जागतिक मतैक्य निर्माण करण्यासाठी गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने उपलब्ध असलेल्या प्रत्येक मंचावरून केलेल्या प्रयत्नांची फळे आता दिसू लागली आहेत. पण असे काही घडताना दिसले की काँग्रेसजनांचे चेहरे कसे काळजीने काळवंडतात याचे जिवंत चित्र दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसच्या वरच्या फळीवरून काहीसे खुंटीवर गेलेले नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या चेहऱ्यावर प्रत्यक्ष उमटलेले महाराष्ट्राने पाहिले. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा प्रमुख सूत्रधार असलेल्या तहव्वूर राणा यास आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून कठोरातली कठोर शिक्षा देण्याच्या इराद्याने गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या मोदी सरकारच्या सार्वत्रिक प्रयत्नांस फळ आले आणि राणाची रवानगी अमेरिकेतून भारतातील एएनआयच्या कोठडीत झाली. त्या हल्ल्यात मृत्यू ओढवलेल्या शेकडो निरपराधांच्या मनावरील भळभळत्या जखमांवर या कारवाईच्या एका घटनेमुळे दिलाशाची फुंकर मारली गेली असताना, पृथ्वीराज चव्हाण यांना मात्र, तहव्वूर राणा याच्या मानवाधिकारांची चिंता अधिक भेडसावत होती. शेकडो बळी घेणाऱ्या, देशावरील सर्वांत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेऊन दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलता धोरणाचे दर्शन जगाला घडविण्याच्या ईर्ष्येला मूर्त स्वरूप आल्यामुळे उभा देश या कारवाईचे स्वागत करत असताना आणि राणाला त्याच्या कृत्याची पुरेपूर अद्दल घडावी यासाठी मनोमन इच्छा व्यक्त करत असताना चव्हाणांचा सूर मात्र, राणाच्या न्यायासाठी सरकारला साकडे घालत होता. राणाला बचावाची संपूर्ण संधी दिली पाहिजे, असा अनाठायी विचार त्यांना सुचण्यामागे नेमकी कोणती प्रेरणा होती, हे समजू शकणार नाही. याच दहशतवादी हल्ल्यातील अजमल कसाब या एकमेव आरोपीच्या विरोधात ढीगभर पुरावे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि देशाबाहेरील शक्तींच्या कारवायांचे अनेक दाखले हाती असतानाही, कसाबला न्यायालयाद्वारेच शिक्षा ठोठावण्यात आली आणि मानवी हक्काच्या न्यायानुसार त्यालाही बचावाची संपूर्ण संधी येथील न्यायव्यवस्थेने दिली होती. राणा यासदेखील ही संधी दिली पाहिजे अशी कळकळीची मागणी करताना चव्हाण यांनी परवा त्याची कबुलीही दिली. तरीही त्यांच्या वक्तव्यातून राजकारणी तिरकसपणा पाझरलाच. एक तर, हा दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुढे अनेक वर्षे देशाबाहेरील आरोपींना शिक्षा घडविण्यासाठी काँग्रेसकडून फारसा पाठपुरावा झाल्याचे दिसले नाही. त्यासंदर्भात काही झाले असेलच, तर ते केवळ खलिते पाठवून कागदी घोडे नाचविण्यापुरते आणि काहीतरी केल्याची नोंद रहावी एवढ्यापुरतेच होते. त्यामुळे, तहव्वूर राणासारख्या खतरनाक आरोपीला देशाबाहेरून मुसक्या आवळून देशात आणणे आणि त्याला त्याच्या क्रूर कृत्याची शिक्षा भोगावयास लावणे हे निर्धाराचे आणि धाडसाचेही काम होतेच. दहशतवादाच्या विरोधात धाडस ही काँग्रेसची प्रतिमा नाही, हे स्पष्ट करणारी एक कबुली या निमित्ताने आवर्जून आठवावयास हवी. ही कबुली खुद्द देशाचे माजी गृहमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी जाहीरपणे एका वक्तव्यातून दिली आहे. जम्मू-काश्मीरला स्वतंत्र अस्तित्व बहाल करून विशेष अधिकार देणारे घटनेतील ३७० वे कलम निष्प्रभ करण्याचे ऐतिहासिक धाडसी पाऊल मोदी सरकारने उचलले तेव्हाही काँग्रेसच्या अनेक नेत्यांच्या उरात भीतीची धडकी भरली होती. हे कलम निष्प्रभ केल्यानंतर पहिल्यांदाच, गेल्या सप्टेंबरात, जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना, सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहळ्याचे निमित्त साधून या भीतीची कबुलीही देऊन टाकली. 'पाच दशकांचे राजकारण' हे शिंदे यांच्या आत्मचरित्राचे नाव! केंद्रीय गृहमंत्री असताना, संरक्षणाची संपूर्ण फळी सोबत असताना, कडेकोट बंदोबस्तासाठी सारी यंत्रणा डोळ्यात तेल घालून सज्ज असतानाही, काश्मीर भेटीच्या दरम्यान देशाच्या खुद्द गृहमंत्र्याची अवस्था कशी होत होती, त्याची ही कबुली आताच्या काश्मीरकडे पाहताना बोलकी आणि वास्तविक वस्तुस्थितीशी तुलना करण्याकरिता पुरेशीदेखील ठरते. अर्थात, शिंदे यांनी सांगितलेला हा किस्सा ते गृहमंत्री होण्याआधीच्या काळातील आहे. पण तेव्हाही देशात काँग्रेसचेच सरकार होते. त्या काळात सुशीलकुमार शिंदे अनेकदा शिक्षणतज्ज्ञ विजय धर यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी जात असत. अशाच एका भेटीत, इतरत्र कुठेही न जाता जम्मू-काश्मीरमध्ये, विशेषतः श्रीनगरमध्ये लाल चौकातील आणि दाल लेक परिसरातील लोकांशी चर्चा करण्याचा सल्ला धर यांनी शिंदे यांना दिला, तेव्हा आपली भीतीने कशी गाळण उडाली होती, याचे शब्दशः वर्णन खुद्द शिंदे यांनी त्या समारंभात बोलताना केले होते. धर यांच्या त्या सल्ल्यामुळे आपल्याला प्रसिद्धी मिळाली, कोणतीही भीती न बाळगता काश्मीरला जाणारा गृहमंत्री असाही लोकांचा आपल्याविषयी समज झाला, पण प्रत्यक्षात आपली भीतीने अक्षरशः गाळण (इथे शिंदे यांनी जाहीरपणे वापरलेला शब्द नमूद करण्यासारखा नाही!) उडाली होती, असेही शिंदे म्हणाले होते. त्या वेळी शिंदे यांनी वर्णन केलेली मनोवस्था आणि आज राणा याच्या प्रत्यार्पणानंतर त्याला न्याय मिळण्याची चिंता उमटविणारा पृथ्वीराज चव्हाण यांचा सूर हे दोन बिंदू जोडले, तर दहशतवादाबाबतच्या काँग्रेसी मानसिकतेचा एकूण आवाका स्पष्ट होऊ शकतो.

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचे पडसाद जगभर उमटले होते. दहशतवादाचे भीषण संकट सर्वत्र किती वेगाने हातपाय पसरते आहे याची जाणीव त्या हल्ल्यानंतर उभ्या जगाला झाली होती आणि दहशतवाद ही कोणा एका देशाची समस्या नाही यावरही जगाचे एकमत झाले होते. मुंबईवरील दहशतवादी हल्ला जगाला हादरवून टाकणारा होता. या प्रकरणातील दोषींना शिक्षा देण्यासाठी भारताकडून जे जे प्रयत्न केले जातील, त्या सर्वांस अमेरिकेकडून पूर्ण सहकार्य केले जाईल



अशी स्पष्ट ग्वाही अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस या देत होत्या, तेव्हा इकडे भारतात मात्र, राणाचे प्रत्यार्पण, खटला चालविण्याची तयारी आणि निरपराधांचे बळी घेणारा कट आखून भारताच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या कटाचा बदला घेऊन असंख्य भारतीयांच्या मनावरील जखमांवर फुंकर घालण्याकरिता सुरू असलेल्या प्रयत्नांना विरोधकांच्या राजकारणाचे रंग मात्र, छेद देऊ पाहात होते. राजकारणात विरोधकांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी करावी, पण जेव्हा राष्ट्रीय हिताचे मुद्दे समोर येतात, तेव्हा तेथे राजकारण आडवे आणू नये, ही जनतेची अपेक्षा असते. पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे एक अन्य नेते विजय वडेट्टीवार आणि कालपरवापर्यंत हिंदुत्वाचा नारा देत राजकारण करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते वेगळा सूर लावून राणाच्या प्रत्यार्पणासारख्या संवेदनशील घडामोडींनाही राजकीय रंग देऊ पाहतात, तेव्हा त्यांना असे करण्याची नेमकी कोणती अपरिहार्यता असते, याची शंका साहजिकपणे उमटते. शेकडो बळी घेणाऱ्या अजमल कसाबलादेखील या देशाच्या न्यायव्यवस्थेने बचावाची पुरेपूर संधी दिली होती. त्याचा गुन्हा पूर्णपणे सिद्ध झाल्यानंतरच त्याला फासावर लटकावण्यात आले, तेव्हा न्यायव्यवस्थेविषयीचा भारतीयांचा आदर दुणावला होता. आता तर, गुन्हेगारासही बचावाची संधी देणाऱ्या या व्यवस्थेतील कायदेसंहितादेखील तोच संदेश देते. असे असतानाही, राणा यास बचावाची संधी दिली जावी अशी घाईघाईने मागणी करण्याचे नेमके कोणते कारण चव्हाण यांना महत्त्वाचे वाटले असावे, हे एक कोडे आहे. एवढेच नव्हे, तर खटल्याची तयारी सुरू होण्याच्या टप्प्यातच न्यायव्यवस्थेवर कांगारू कोर्ट अशी शेरेबाजी करणे हा व्यवस्थेच्या क्षमतेवरही प्रश्नचिन्ह उमटविण्याचाच प्रयत्न नसेल ना, अशीही शंका उपस्थित होऊ शकते. तहव्वूर राणा याच्यावरील खटला निष्पक्षपणे चालविला गेला पाहिजे, त्याचे मानवाधिकार जपले गेले पाहिजेत, असे सांगताना, या देशात कांगारू न्यायालय चालणार नाही, असा इशारा देणाऱ्या चव्हाण यांना कसाब खटल्यात न्यायालयाने बजावलेली न्यायाची भूमिका मान्य आहे, तरीही त्यांनी कांगारू न्यायालय चालणार नाही, असे का म्हटले असावे, याचा खुलासा होणे ही काळाची गरज आहे. चव्हाण हे काँग्रेसचे एका काळातील राष्ट्रीय स्तरावरील नेते आहेत. वडेट्टीवार हे महाराष्ट्रापुरते का होईना, काँग्रेसचे प्रतिनिधित्व करतात. राज्यातील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तहव्वूर राणा यास भारतात आणले गेले असे बिनदिक्कत विधान करताना, त्या हल्ल्यात जीव गमावलेल्या शेकडो निष्पापांच्या कुटुंबीयांच्या मनात तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणामुळे उमटलेल्या समाधानाच्या भावनांना धक्का देत असल्याची जरादेखील जाणीव वडेट्टीवार यांना झाली नसेल का, असे अनेक प्रश्न या भूमिकांनी अधोरेखित केले आहेत. तहव्वूर राणा हा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक पाक पुरस्कृत लष्कर-ए-तोयबा या संघटनेसाठी काम करीत असताना दोषी आढळला आणि मुंबईवरील हल्ल्याच्या आखणीत त्याचा महत्त्वाचा सहभाग असल्याचेही उघड झाले. त्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी दहशतवादी हल्लेखोरांना सर्वोच्च शौर्य पुरस्कार देण्याची शिफारस पाकिस्तान सरकारकडे करण्याचा सल्ला त्यानेच हेडली यास दिला होता, असेही उघड होऊ लागले आहे. भारताविरुद्ध दहशतवादी मार्गाने थेट युद्ध पुकारणाऱ्या या हल्ल्याचे असे स्पष्ट समर्थन करणाऱ्या आणि कटासाठी मदत करणाऱ्या तहव्वूर राणाच्या मानवी हक्कांची जाणीव ठेवणे न्यायाच्या दृष्टीने गैर नाही, पण त्याच्यासाठी किल्ला लढविण्यास सरसावण्याआधी चव्हाण यांनी त्या हल्ल्यामुळे दुखावलेल्या भारतीयांच्या जाणिवा लक्षात घेणे योग्य ठरले नसते का, असाही प्रश्न त्यांच्या वक्तव्यानंतर समोर आला आहे. न्यायव्यवस्थेने आपले काम सुरू करण्याच्या प्राथमिक टप्प्यावरच या व्यवस्थेवर कांगारू न्यायालय अशा शंकेचा ठपका ठेवण्यामागे चव्हाण यांना तशी शंका येणारी कोणती बाब आढळली असावी हेही स्पष्ट व्हावयास हवे.

कांगारू न्यायालय हा न्यायव्यवस्थेसाठी अपमानकारक शब्दप्रयोग मानला जातो. कायदा किंवा कायद्याच्या मानकांची जाणीव नसलेल्या व्यवस्थेबाबत सहसा असा उल्लेख केला जातो. अशी व्यवस्था न्यायाच्या योग्य प्रक्रियेकडे दुर्लक्ष करते आणि पूर्वनिर्धारित निष्कर्षापर्यंत पोहोचू शकते. हा शब्द १८४१ मध्ये अमेरिकेत वापरला गेला होता. कांगारूंच्या मूळ भूमीत, ऑस्ट्रेलियासारख्या देशातही न्यायव्यवस्थेसाठी असा शब्दप्रयोग वापरला गेल्याचा इतिहास नाही. कदाचित याचा उल्लेख ब्रिटनमध्ये झाला असावा असे मानले जाते. ऑस्ट्रेलियन वंशाच्या लोकांना गुन्हेगार ठरवून त्यांना शिक्षा देण्याचा पूर्वनिर्धारित न्याय म्हणून हा शब्दप्रयोग केला गेला, असे मानतात. अशा संदिग्ध शब्दाचा वापर करून न्यायाची प्रक्रिया सुरू होण्याआधीच त्यावर शंका उपस्थित करण्यामागचे नेमके राजकारण अनाकलनीय तर वाटतेच, पण त्यामागील राजकीय हेतूविषयी देखील संदिग्धता असल्याने चव्हाण यांनी घाईघाईने ही प्रतिक्रिया का द्यावी याविषयी आश्चर्यदेखील वाटणे साहजिक आहे. देशाच्या सुरक्षिततेलाच आव्हान देणाऱ्या व देशात अस्थिरता माजवून अराजकसदृश स्थिती निर्माण करणाऱ्या एका विदेशी कटातील गुन्हेगारास न्याय मिळावा यासाठी एवढी काळजी व्यक्त करण्याऐवजी, गुन्हेगारास शिक्षा ठोठावण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे समाधान अधिक महत्त्वाचे व जखमी मनांना दिलासा देणारे ठरले असते.

तहव्वूर राणा याच्या पूर्वेतिहासाची पाने एव्हाना पुरेशी उलगडली गेली आहेत. तो भारताच्या दृष्टीने गुन्हेगारच आहे, यात शंका नाही याची आजवरच्या इतिहासावरून लोकांना खात्री पटली आहे. आता त्याच्या चौकशीतून अन्य काही कटांचे धागेदोरेही उघड होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दक्षिण भारतातील लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवादी कारवायांचे धागेदोरेही त्याच्यापर्यंत पोहोचलेले असावेत, या शंकेवर अधिक प्रकाशझोत पडू शकेल. २५ जुलै २००८ रोजी बंगळुरूमध्ये घडविण्यात आलेली बॉम्बस्फोटांची मालिका, दक्षिण भारतातील लष्कर-ए-तोयबासाठी तरुणांची भरती, अशा काही बाबींमध्ये राणाचा सहभाग असल्याचेही उघड झाले आहे.

केवळ भारतातच नव्हे, तर अमेरिकेतही दहशतवादी कारवाया घडवून आणण्यात त्याचा पुढाकार होता आणि त्याच आरोपावरून त्याला अमेरिकेत २००९ मध्ये अटक झाल्यानंतर चौकशी सुरू झाली होती. आता केवळ न्यायव्यवस्थेची न्यायाची भूमिका बजावणे आणि न्यायालयात त्याच्यावरील आरोप सिद्ध करून त्यास दोषी ठरविणे व यासाठी त्याला योग्य अशी कोणतीही कठोर शिक्षा ठोठावणे ही न्यायिक प्रक्रिया प्रतीक्षित आहे. अशा टप्प्यावर राणाच्या हक्कांची काळजी वाहण्याआधी, कोणीही राजकारणापलीकडचे देशहित लक्षात घ्यावयास हवे, अशीच जनतेची भावना असणार यात शंका नाही. राजकारण चालविण्यासाठी, एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी आणि जनतेच्या मनात संभ्रम माजविण्यासाठी राजकारणात अन्य अनेक मुद्दे दररोज सापडतच असतात. पण ज्या मुद्द्यांशी जनतेच्या भावना जोडलेल्या आहेत, जे मुद्दे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि त्यामुळे संवेदनशील ठरले आहेत, त्या मुद्द्यांचे राजकारण करून परस्परांवर कुरघोडीचे डाव खेळण्याचे राजकारण अनाकलनीय ठरते. व्यापक देशहिताच्या दृष्टीने अशी कोणतीही कारवाई अन्य कोणत्या देशात झाली असती, तर विरोधकांनी अशीच भूमिका घेतली असती का, असा विचार यामुळे जनतेच्या मनात बळावला, तर त्याविषयी आश्चर्य वाटणार नाही. गुन्हेगारांस शिक्षा होणार असे स्पष्ट होऊ लागले की अनेकांना त्याच्या मानवाधिकारांच्या जाणिवा जाग्या होऊन अस्वस्थ वाटू लागते. अशा गुन्हेगारांच्या अमानवी कृत्यांमुळे किती निष्पापांचे मानवाधिकार, जगण्याचा मूलभूत अधिकार नाहक हिरावून घेतला जातो, याचा विचार अशा अस्वस्थ मानास शिवत असेल किंवा नाही, अशी शंका वाटणे साहजिकही असते. तसे अनेकदा व्यक्तदेखील होते. जेव्हा मानवाधिकारासाठी असे लढे सुरू होतात, तेव्हा असे फक्त भारतातच होत असेल का, हाच विचार कोणाच्याही मनात येऊ शकतो, एवढेच!

dineshgune@gmail.com

---

## रविवारची पत्रे

### जालियनवाला बाग हत्याकांड स्मृतिदिन



जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल १९१९ रोजी घडले. या हत्याकांडाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यावर खूप मोठा परिणाम झाला. क्रांतीची आग आणखी भडकली. मार्च १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने रौलट ॲक्ट पारित केला. या कायद्यामुळे देशद्रोहाचा आरोप असलेल्या कुठल्याही व्यक्तीला, कोणतीही चौकशी न करता, कोणताही खटला न चालवता तुरुंगात टाकण्याचा अधिकार पोलिसांना मिळाला. त्यामुळे या कायद्याविरोधात देशभरात असंतोषाची लाट उसळली. प्रखर विरोध होऊ लागला होता. एप्रिलमध्ये अमृतसर येथे या कायद्याविरोधात ठिकठिकाणी आंदोलने झालीत. सत्यपाल आणि डॉ. सैफुद्दीन हे या आंदोलनाचे नेते होते. त्यांना अटक करण्यात आली आणि या अटकेचा निषेध म्हणून १५ ते २० हजार लोक शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी जालियनवाला बाग येथे जमले होते. व्यासपीठावर भाषणे सुरू होती आणि अचानक बिग्रेडियर जनरल डायर तिथे आपल्या फौज-फाट्यासह पोहोचला. क्षणाचाही विलंब न करता, कुठलीही सूचना न देता पोलिसांना त्याने गोळीबाराचा आदेश दिला. अचानक गोळीबार झालेला पाहून तिथे प्रचंड गोंधळ उडाला. लोक सैरभैर पळू लागले. पण पोलिसांनी बागेतून बाहेर जायचा रस्ताच बंद करून ठेवला होता. काही लोक भिंतीवर चढत होते. त्यांनाही गोळ्या मारल्या. शेवटी कुठलाच मार्ग नाही म्हणून लोकांनी (ज्यामध्ये स्त्रिया, मुलं, पुरुष, अपंग, वृद्ध होते) बागेतल्या विहिरीत उड्या घेतल्या. पण त्या निर्दयी, हृदयशून्य, क्रूर जनरल डायरने इथेही गोळ्या मारायला सांगितलं. वरून पोलिस गोळीबार करीत होते आणि विहिरीत लोक तडफडून मरत होते. तब्बल दहा मिनिटे सगळीकडे रक्तपात, मृत्यूचे तांडव चालू होते. सर्वत्र आरोळ्या, किंकाळ्या, रक्ताच्या चिरकांड्या आणि बंदुकीचे आवाज आसमंतात घुमत होते. सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले होते. काहीच कुणाला दिसत नव्हते. जो तो प्राण वाचविण्याच्या आकांताने पळत होता. जेव्हा पोलिसांच्या बंदुकीतील गोळ्या संपल्या तेव्हाच गोळीबार थांबला. एखाद्या सैतानालाही लाज वाटावी असा नरसंहार त्या क्रूर डायरने जालियनवाला बागेत घडवला. ब्रिटिशांची आकडेवारी ४०० ते ५०० लोकच यात मेली असे सांगते. पण प्रत्यक्षात हजारच्या वर लोक मरण पावले आणि ५००० पेक्षा जास्त लोक जखमी झालेत. त्यांना कुठलीही वैद्यकीय मदत मिळाली नाही. यामुळे संपूर्ण देशात ब्रिटिशांविरुद्ध संतापाची लाट उसळली. ज्या वेगाने तो राक्षस आला त्याच वेगाने नरसंहार करून निघून गेला.

मागे ठेवून गेला फक्त आकांत. बागेत प्रेतांचा खच पडला होता. एवढं करूनही जनरल डायरचे समाधान झाले नाही तर त्याने संपूर्ण शहराची वीज आणि पाणी बंद केले. ब्रिटिश सरकारने या साऱ्या प्रकरणाची दखलच घेतली नाही. उलट त्याला क्लीन चिट दिली आणि त्याला भारतात काम करण्यावर मनाई केली. अशा या जनरल डायरचा आजारपणामुळे १९२७ मध्ये इंग्लंडमध्ये मृत्यू झाला. याचा बदला म्हणून २१ वर्षांनंतर उधमसिंग याने सर माईकल ओ डायर याला गोळ्या घालून ठार केले. कारण सर मायकल ओ डायरने जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन केले होते. ब्रिटिश साम्राज्यातील एक काळा अध्याय म्हणून या हत्याकांडाची इतिहासात नोंद झाली.

**माधवी पत्की**/नागपूर

### काँग्रेसला मुस्लिमांचे हित नकोच

बहुचर्चित वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक लोकसभेच्या मंजुरी पाठोपाठ राज्यसभेतही मंजूर झाले. त्यानंतर राष्ट्रपतींनी त्याला मंजुरी दिली आणि सरकारने अधिसूचना जाहीर करून हा कायदा अमलातही आला. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बरोबरच अल्पसंख्यक खात्याचे मंत्री किरेन रिजिजू, गृहमंत्री अमित शाह आणि एकूणच मोदी सरकारने महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

या विधेयकामुळे गरीब, वंचित, पीडित मुस्लिमांना सन्मानाने जगण्याचा एक नवीन मार्ग मिळाला आहे. त्यांना राष्ट्रीय प्रवाहापासून सातत्याने दूर ठेवणाऱ्या सरंजामशाही वृत्तीला लगाम बसला आहे. विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीमध्ये सक्रिय योगदान देण्याची संधी त्यांना मिळणार आहे. मुख्य म्हणजे त्यांना स्वयंविकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. वक्फ बोर्ड आता भ्रष्टाचाऱ्यांच्या हातून निघून इतर संस्थांप्रमाणेच संविधानानुसार चालणारी संस्था बनणार आहे. वक्फ बोर्डाच्या अमर्यादित अधिकारांचा गैरवापर करून आपले उखळ पांढरे करून घेणाऱ्यांना अर्थातच चौकशीला सामोरेही जावे लागेल. एवढी प्रचंड मालमत्ता असूनही वक्फ बोर्ड अपेक्षित कार्य का करू शकले नाही, त्यांचे वार्षिक उत्पन्न दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात का घसरले, या मालमत्तेतून मिळणारा पैसा कोणाच्या खिशात गेला याचाही जवाब संबंधितांना द्यावाच लागेल.

या विधेयकामुळे मुस्लिमांच्या मालमत्ता लुटल्या जातील, मशिदी बंद होतील, मुस्लिमांना नमाज पढणे अशक्य होईल, त्यांच्या धार्मिक अधिकारांचा अधिक्षेप होईल असा सर्रास खोटा आणि सर्वसामान्य मुस्लिमांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न काँग्रेसचे आणि इतर पक्षांचे नेते करीत आहेत. काँग्रेस पक्षाला मुस्लिमांचा विकास नको आहे. हिंदू- मुस्लिम समाजामध्ये सतत तणाव निर्माण करायचा, त्यांना राष्ट्रीय प्रवाहात येऊच द्यायचे नाही, ब्रिटिशांचे फोडा आणि झोडा धोरण वापरून, मुस्लिमांचा केवळ एक मतपेढी म्हणून वापर करायचा आणि सत्ता भोगायची ही काँग्रेसची परंपरा आहे. मुस्लिमांनीही ती ओळखली आहे. सबका साथ, सबका विकास साधण्यासाठीच मोदी सरकारने ही कायदादुरुस्ती केली आहे हे मुस्लिमांच्याही लक्षात आले आहे. काहीही असले तरी एकूणच या विधेयकामुळे अल्पसंख्यकांसह समस्त देशवासीयांसाठी एक नवीन सकाळ घेऊन आले आहे. मुस्लिमांच्या विकासामध्ये झारीत बसलेल्या शुक्राचार्यांना लगाम घालून, सबका साथ, सबका विकास, धोरणाने चालणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्यासाठी प्रगतीची, विकासाची अनेक द्वारे उघडी केली आहे. राष्ट्र सर्वोपरी मानणाऱ्या सर्व देशवासीयांना या विधेयकाच्या मंजुरीमुळे समाधान लाभले आहे. आता या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण आव्हान मोदी सरकारपुढे आहे. पण अनेक आव्हानांचा सहज सामना केलेल्या मोदी सरकारला ते अशक्य नाही, हेही स्पष्ट आहे. मोदी सरकारचे या ऐतिहासिक कार्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●


### 'मूल्य' जपणारे वर्तमानपत्र!

सकाळचा पायी फेरफटका मारताना दोन पेपर विक्रीचे स्टॉल लागतात. त्या दोन्ही स्टॉलवर तरुण भारत उपलब्ध असतात. रविवारची संख्या जरा जास्त असते. मला ते पाहून फार आनंद होतो. आई-वडील, शाळा यानंतर संस्काराची पेरणी कोणी करत असेल तर तो घरचा पेपर. त्या बाबतीत लहानपणापासून तरुण भारत वाचणारी घरे खरोखरच श्रीमंत. आता तर या श्रीमंतीत अजून भर पडली आहे. आधी मधलं पान जबरदस्त वजनदार राहत होतं. आता दुसरेही पान त्याच तोडीचं झालं आहे. त्यातील विविधता लक्ष वेधणारी आहे. महिला आघाडीने तर बरेच ठिकाणी कब्जाच केला आहे. सहज आणि सुंदर लिहितात सगळ्या लेखिका. लेखांचे विषयही वेगवेगळे आणि सुटसुटीत वाटतात. बालांच्या कविता, पक्ष्यांची दुनिया, मोठ्या माणसांनाही अजून आनंद देऊन जाते. निसर्गाशी जुळून असलेली असणारी माणसाची नाळ यासाठी कारणीभूत असावी. विचारपुष्प माणसाला विचार करून कार्य करण्यास प्रवृत्त करते. सकारात्मक ऊर्जेचे महत्त्व जर का पाहायचं असेल तरुण भारत वाचायलाच हवा. भारतात गोहत्या बंदी असावी का? असे बुद्धिभेद करणारे लिखाण कधीही कोणी तरुण भारतात पाहिले नाही. फक्त चांगल्या गोष्टीची पाठराखण. साहित्य, संस्कृती, अर्थकारण, जगाचा मागोवा, अनंत विषय सहज वाचायला मिळतात. सध्या करण्यात आलेले नवीन बदल स्वागतयोग्य आहेत. पृष्ठसंख्या वाढली असली तरी मूल्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही, ही आनंदाची बाब आहे. नियमित वाचनात येणारे वेध सदर पर्यावरण विषयक जागृतीबाबत भरपूर सहकार्य करतं. पर्यावरण विषय चिंतेच्या पलीकडे चाललेला आहे. संघानेही पर्यावरण आपल्या आयामात घेऊन त्यावर कार्य सुरू केले आहे. तरुण भारतचे शताब्दी वर्ष आणि श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात बीज संकलनाचे घेतलेले कार्य मौलिक आहे. बदल मीच घडवणार! हा एक मौलिक विचार आहे. या विचाराला माझ्या या वजनदार वृत्तपत्राची साथ सगळ्यांना महत्त्वाची राहील यात कुणालाच काही शंका नाही.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

●● ●●

### भारतीय बाजारपेठेतील मंदी घालविण्यामागे हिंदूंचे योगदान



हिंदू धर्मीय व्यक्तींच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या विविध कार्यक्रमामुळे, हिंदू सण उत्सवांमुळे, देवीदेवतांच्या मंदिर निर्माण कार्यामुळे, पूजाविधी व हिंदू पर्यटनस्थळ बघणे यासाठी करावी लागणारी खरेदी-विक्री तसेच पर्यटन यामुळे होणाऱ्या रोजगार निर्मितीने भारतीय बाजारपेठ बाराही महिने हसमुख स्थितीत, गर्दीने हाऊसफुल्ल अशी नेहमी बघायला मिळते. हे अनेक वर्षांपासून असेच सुरू आहे. यापुढेही दरवर्षी असेच सुरू राहणार. यात काहीही फरक पडणार नाही. भारतीय बाजारपेठ हसमुख ठेवण्यात हिंदू धर्मीयांचे फार मोठे योगदान आहे. आता हिंदू धर्मीय सण, उत्सवांमुळे भारतीय बाजारपेठेत काय काय घडते, रोजगार निर्मिती होऊन सर्व जाती-धर्माच्या लोकांना रोजगार कसा मिळतो हे सविस्तरपणे बघूया.

हिंदू धर्मात दरवर्षी गुढीपाडवा, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, अक्षय्यतृतीया, वटपौर्णिमा, आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा रक्षाबंधन, मंगळागौरी, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, पोळा, हरितालिका, श्रीगणेशचतुर्थी, महालक्ष्मी, ऋषिपंचमी, अनंत चतुर्दशी, पितृपक्ष श्राद्ध, घटस्थापना, नवरात्रोत्सव, दसरा, कोजागरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, दीपावली, भाऊबीज, श्रीदत्त जयंती, मकरसंक्रांती, श्रीगणेश जयंती, महाशिवरात्री हे सर्व सण, उत्सव येतात तसेच दर तीन वर्षांनी अधिकमास पुरुषोत्तम मास येतो.अधिक मासामध्ये भगवान श्रीविष्णूंची भक्ती केली जाते. लेकीला-जावयाला धोंडे जेवण दिले जाते. या महिन्यात दानधर्म केला जातो. सासरवाडीकडून जावयाला कपड्यांचा अहेर केला जातो त्याच बरोबर सोन्याचे चांदीचे धोंडे दानात देतात. याबरोबरच राष्ट्रीय सण, साधुसंतांच्या, महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करण्याचे कार्यक्रम होतात.

चैत्र महिन्यात पहिला सण गुढीपाडवा येतो. यावेळी बाजारपेठेत हिंदू धर्मीय लोकांची भरपूर गर्दी बघायला मिळते. साडेतीन मुहूर्तांपैकी गुढीपाडवा हा एक मुहूर्त असल्याने हिंदू व्यक्ती या दिवशी सोनाराच्या दुकानातून सोनं खरेदी करतात. गुढीपाडव्यासाठी बांबूची काठी, साडी पीस, स्टीलचा किंवा तांब्याचा गडवा, आंब्याचे पानासह देठवाला आंबा, कडुलिंबाच्या पानांचा एक फांटा, थरसोड, गाठी, फुलांचा हार फुलं, प्रसाद, किराणा दुकानांतील वस्तू, भाजीपाला इत्यादी बाजारपेठेतून विकत घेतात. यामुळे बाजारपेठेत पैशांचे चलनवलन होते. सर्व जाती धर्माच्या लोकांना रोजगार मिळतो. या वस्तू विकत घेण्यासाठी हिंदू धर्मीय व्यक्ती पायी, स्वतःच्या सायकलने, मोटारसायकलने, चारचाकी वाहनाने, रिक्षाने, ऑटोने जातात. त्यासाठी स्वतःच्या वाहनात पेट्रोल किंवा डिझेल भरावे लागते तसेच बसने, रेल्वेने, रिक्षाने, ऑटोने प्रवास केल्यास प्रवास भाडे द्यावे लागते. यासाठी पैशांचे व्यवहार होतात.

गुढीपाडव्यापासून सुरू झालेले सण, उत्सव यामुळे अशीच लगबग वर्षभर बाजारात सुरू असते. या काळात सर्वत्र उत्साही वातावरण असते. मिरवणुका, शोभायात्रा निघतात. तेथेही कार्यक्रमांची रेलचेल असते. लहान व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात पैसे मिळतात.

संपूर्ण भारतात हिंदू देवीदेवतांची अनेक मंदिरे व पर्यटनस्थळे आहेत. या मंदिरातील देवीदेवतांच्या दर्शनासाठी बाराही महिने दररोज हिंदू भाविक पायी, आपल्या सायकलने, मोटारसायकलने, रेल्वेने, विमानाने, रिक्षाने, ऑटोने जातात. तिथे गेल्यावर स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. यामुळे भारतीय बाजारपेठेत कधीही मंदी राहात नाही आणि सर्व जाती, धर्मातील लोकांना रोजगार मिळण्यात हिंदूंचे भरीव योगदान आहे, हे मात्र नक्की.

**अशोक अनंतराव पंडित**/९९२२२३६७७३

●● ●●

### कुणाच्या खांद्यावर?

एक सुशिक्षित तरुण स्त्री, तिचे लग्न होते. अर्थातच लग्नानंतर मूल होणं हे गृहीतच धरलेलं असतं आणि तेच हवं असतं. तिला नेमका बीजांडकोषाचा कॅन्सर होतो. तिचं दुर्दैव म्हणा किंवा तिच्या कुटुंबांचे नशीब म्हणा ती बरी होते. परंतु तिला, तिच्या कुटुंबाला डॉक्टर सांगतात की, हिला मूल होणं म्हणजे जिवाला धोका होऊ शकतो. तेव्हा गर्भधारणा टाळलेली बरी. दत्तक घ्यावे.

पण हे तिच्या घरच्यांना, तिला स्वतःला पटणंच अशक्य असतं. ज्ञान नाही. तज्ज्ञांचा सल्ला ऐकायचा कशाला? मूल हवं ना? मग अनेक मार्ग उपलब्ध आहेत. टेस्ट ट्युब बेबी सेंटर्स आहेत. भरपूर पैसे टाकले की झालं. डॉक्टरही लाखो आहेत. आम्हाला बाई स्वत:चच मूल हवं बरं का!

मग खरं न बोलता, रिपोर्ट हरवलेले आहेत असं सांगून टेस्ट ट्युब बेबीचा घाट घातला जातो. आणि कर्मधर्म दुर्दैवाने तो प्रयत्न यशस्वी होतो. ९ महिने निघणे मात्र कठीण होते. सातव्याच महिन्यात त्रास व्हायला लागतो. रक्तदाब वाढतो. वार खालच्या बाजूला बसते आणि टेस्ट ट्युब बेबीचे दान जुळ्या मुलांचे पडते.

जिथे कॅन्सरचे ऑपरेशन झालेले तिथे कसं जायचं? रागवतील आपल्याला म्हणून ७ महिन्यांपर्यंत दुसरीकडे इलाज केला जातो. दुखणे सुरू झाल्यावर मात्र जुन्या दवाखान्याची आठवण येते. तिथेच पूर्वी ५० टक्के कमी खर्चात कॅन्सरचे ऑपरेशन झालेले असते. म्हणून कदाचित.

तिथे गेल्यावर सातव्या महिन्यातली जुळी मुलं, वजन कमी असणार, त्यांना आयसीयूत ठेवावे लागू शकणार, खर्च वाढणार आणि तो अंदाजे १०-२० लाखांपर्यंत जाऊ शकतो असे सांगण्यात येते. पैसे नाहीत म्हटल्यावर 'जेवढे भरू शकतात तेवढे तर भरा' म्हटल्यावरही वादविवाद, वेळकाढूपणा, इकडे तिकडे फोनाफोनी झाल्यावर, पैसे न भरता ४-५ तासांनी ही बाई तिचे कुटुंब कोणाला न सांगता दवाखान्यातून पलायन करतात. ससूनमध्ये गेल्यावर सोय पटत नसल्याने दुसऱ्या खाजगी दवाखान्यात नेतात. संध्याकाळी तिथेही ॲडमिट करून, दुसऱ्या दिवशी सकाळी ९-९.३० ला सिझेरियन करण्यात येते. बाईचा रक्तस्राव जीवघेणा ठरतो. मग तशाच अवस्थेत मोठ्या मणिपाल हॉस्पिटलमध्ये नेले जाते. तिथे ती आधीच आपली जीवनयात्रा संपवून पोहोचलेली असते.

अरेरे! अरेरे!! बिच्चारी स्त्री.

या सगळ्या घटनांनंतर दोष आणि ठपका ठेवला जातो- जिथून पळून गेले असतात ती बाई -नातेवाईक त्यांना मारेकरी म्हटले जाते, अमानुष म्हटले जाते. धमक्या दिल्या जातात. टीव्ही आणि वृत्तपत्रे पण सर्व रंगवून वाट्टेल ते बोलू लागतात. राजकारण घुसतं सगळीकडे.

शांततेने विचार करा- बाईचा मृत्यू होण्यात दोष कुणाचा?

१) या आई-वडिलांच्या मूर्ख अट्टहासाचा? (कसंही करून आपलं मूल हवंच)

२) टेस्ट ट्युब बेबी केंद्र इंदिरा आयव्हीएफचा? वाट्टेल तेवढे पैसे देऊन 'बघू करून' देणाऱ्या चढाओढीत पुढ जाणाऱ्यांचा?

३) ज्या दवाखान्यात सत्य परिस्थितीचे कटू कथन करण्यात आले त्या (दीनानाथ) येथील डॉक्टरांचा? पेशंट पळून (अबसेंड) झाल्याची पोलिसांना खबर न देणाऱ्यांचा?

४) सूर्या हॉस्पिटलमध्ये ज्यांनी रात्री सिझेरियन न करता सकाळी (इलेक्टिव्ह) सिझेरियन करून रक्तस्राव थांबवू न शकले त्यांचा?

५) मणिपाल हॉस्पिटलमध्ये अत्यवस्थ अवस्थेत आलेल्या स्त्रीला पोस्टमॉर्टमही न करता डिस्पोज ऑफ करणाऱ्यांचा?

कुणाच्या खांद्यावर या मृत्यूचे ओझे लादायचे सांगा?

चर्वितचर्वण, लाथालाथी, हाणामारी, ठपके, दोषारोप, मुलाखती, कमिट्या नेमून चर्चा हे सर्व इथपर्यंत की दीनानाथ हॉस्पिटलला जागाच द्यायला नको होती, म्हणेपर्यंत मजल जाते? आतापर्यंत आणि आताही या मृत्यूचा दोष दीनानाथ हॉस्पिटलचा आहे का? सूर्या हॉस्पिटलबद्दल एकही शब्द बोलला नाही कुणी. ही सगळी चिखलफेक करून जीव परत येणार आहे? शेळी जाते जिवानिशी... 'निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य' ही यंदाच्या झालेल्या जागतिक आरोग्य दिनाची थीम नुसती कोरडीच आहे का?

**डॉ. संजीवनी केळकर**/एम. एस.

●● ●●

### आर्थिक तफावत खरोखरच चिंतेची बाब

दि. १२ एप्रिलच्या तरुण भारत वाचक पत्रात 'हा खेळ लूटमारीचा ' या पत्राद्वारे अमोल करकरे यांनी योग्य मुद्दे मांडले आहेत. आपल्या देशात निवडणुका जिंकण्यासाठी सगळेच राजकीय पक्ष मोफतचे राजकारण करण्यात पटाईत आहेत. कसेही करून सत्तेवर राहणे हा एककलमी कार्यक्रम. पुढे सत्तेवर आल्यानंतर सरकारी तिजोरीवर येणारा आर्थिक भार सांभाळताना कसरत करावी लागते आणि पुन्हा कर्ज. कर्जाची परतफेड, व्याज, सरकारी कर्मचारी, पेन्शनभोगी याचाच वार्षिक आर्थिक भार राज्यावर सुमारे ६० टक्के आहे असे तज्ज्ञ सांगतात. आपल्या देशाची विकासाकडे उत्तम घोडदौड सुरू असली तरी समाजात आर्थिक उत्पन्नाची दरी रुंदावतच आहे. सरकारी नोकर किंवा पेन्शनभोगी नसणाऱ्या वर्गाची संख्या खचीतच प्रचंड आहे.

या उलट सरकारी वेतन, पेन्शन, वेळोवेळी पगारवाढ, महागाई भत्ते मिळणारा वर्ग कमी असला तरी आर्थिकदृष्ट्या समाधानकारक दिसतो. सरकारी पेन्शनभोगी अलिकडे महिन्याला पन्नास ते साठ हजारपर्यंतही उत्पन्न असणारे दिसतात. अर्थात या बाबतीत इतरांनी बोटे मोडण्याची आवश्यकता नाही. कारण सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीतील सेवा शर्तीनुसारच हा लाभ मिळतो असेही सांगणारा एक वर्ग. दुसरीकडे इतर सेवानिवृत्तांना बँकेत गुंतवणूक केलेल्या ठेवींवरील व्याज किंवा इतर गुंतवणुकीतील उत्पन्नाद्वारे (जे कमीही होत असते) आपला गाडा हाकावा लागतो. या आर्थिक तफावतीवर कोणाकडेही उपाय नसल्याचे सध्या तरी चित्र आहे. त्यामुळे या वर्गाने निवडणुकीतील जुमलेबाजी, न पेलणारी आश्वासने मुकाट्याने बघत राहावे आणि ज्येष्ठांनी आनंदमय, ताणविरहित जीवन कसे जगावे या समाजमाध्यमांद्वारे येणारे उपदेशपर संदेश, चित्रफिती पाहून आपली दिनचर्या चालवावी हेच बरे.

**राम राजे**/९४२१७७९९४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# संत बाळूमामा यांचा उपदेश म्हणजे न्याय, नीति आणि धर्माचा मार्ग -माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

## आ.बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शेकडो कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीत पक्षप्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संत बाळूमामा यांचा उपदेश म्हणजे न्याय, नीति आणि धर्माचा मार्ग होय. त्यांनी लोकांना चांगला जीवन जगण्याचा आणि परमेश्वराची भक्ती करण्याचा मार्ग दाखवला. ते नेहमी लोकांना 'सत्य, प्रेम आणि नम्रता' या मूल्यांचा आदर करायला सांगत होते. बाळूमामा लोकांना नेहमी सत्य बोलण्याचा आणि एकमेकांवर प्रेम करण्याचा उपदेश करत होते. त्यांनी लोकांना धार्मिक विधी आणि पूजा नियमितपणे करण्याचा उपदेश दिला. संत बाळूमामायांनी लोकांना नम्र आणि विनम्र राहण्याचा उपदेश करत होते. ते म्हणत होते की, 'सत्य बोलणे आणि नम्रता बाळगणे म्हणजे देवाचे प्रेम मिळवणे'. असे संत बाळूमामा नेहमी सांगत असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले. परतुर तालुक्यातील वाघाडी येथे संत बाळूमामा महाराज यांच्या मंदिरात आयोजित महाआरती व भारतीय जनता पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, बाळूमामा लोकांना परमेश्वराची भक्ती करण्याचा उपदेश करत होते. ते म्हणत होते की, 'भक्ती म्हणजे देवाने आपल्यावर कृपा करणे'. संत बाळूमामांनी संसार त्यागून देवाच्या चरणी लीन होण्याचा मार्ग दाखवला. बाळूमामा लोकांना कल्याणासाठी आणि भल्यासाठी चांगले कर्म करण्याचा उपदेश करत होतेसंत बाळूमामा यांनी लोकांना देवाच्या मार्गावर चालण्याचा आणि चांगले जीवन जगण्याचा उपदेश दिला, ज्यामुळे ते आज देखील लोकांना प्रेरणा देत आहेत. यावेळी भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे उपसभापती संभाजी वारे पंचायत समिती सदस्य दिगंबर मोजले रामप्रसाद गिरी संदीप तनपुरे संजय अवचार यांच्यासह शेकडो युवा अबालवृद्ध माता भगिनी उपस्थित होत्या.



वाघाडी येथे आयोजित संत श्री बाळूमामा महाराज यांच्या मंदिरात महाआरती व भारतीय जनता पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा आज पार पडला. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा संपूर्ण इतिहास कार्यकर्त्यांच्या समोर मांडला. अनेकांनी पक्ष सोडले परंतु आपण निष्ठापूर्वक आजही भारतीय जनता पक्षात आहोत अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी पक्षाविषयी असलेली निष्ठा व्यक्त केली यावेळी भाऊसाहेब टेहळे भीमराव डेहळे वैजनाथ टेहळे रामकिसन टेहळे अंबादास वाघमोडे नारायण गाडे माऊली बोडके मारुती टेहळे भोसले महाराज श्रीराम गाडे रामजी माने शिवाजी अवचार शेषराव अवचार शंभू तात्या टिहळे एकनाथ अर्जुने प्रकाश मार्कंड नंदकुमार राठोड बापूराव पवार भीमराव नाईक शिवाजी देशमाने यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

## संक्षिप्त

## पुतण्यानेच चुलत्याला संपवले!



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

कौटुंबिक वादातून घडलेली एक खळबळजनक घटना समोर आली आहे. काल (१२ एप्रिल) सायंकाळी पुतण्याने आपल्या सख्या चुलत्याचा निर्घृण खून केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, चौघांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये एका विधीसंघर्ष बालकाचाही समावेश आहे. ही दुर्दैवी घटना जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील पांगरखेडा येथे घडलीय.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिगंबर श्रीरंग लांडे (वय अंदाजे ५०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, काही दिवसांपासून सुरू असलेल्या कौटुंबिक वादाचे पर्यवसान हिंसक घटनेत झाले. काल सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास पुतण्या आणि भावाने मिळून त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. बेदम मारहाणीमुळे लांडे हे जागीच बेशुद्ध झाले.

ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना तात्काळ अंबड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जालना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. तेथून खासगी रुग्णालयात हलवूनही त्यांचा जीव वाचवता आला नाही. घटनेची माहिती मिळताच अंबड पोलिसांनी त्वरित तपास सुरू केला. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात चौघांना अटक करण्यात आली असून त्यामध्ये एका विधीसंघर्ष बालकाचाही समावेश आहे. उर्वरित आरोपींविरुद्ध शोधमोहीम सुरू आहे. या दुर्दैवी घटनेने पांगरखेडा गावात शोककळा पसरली असून, ग्रामस्थांत संतापाचे वातावरण आहे. आरोपींवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## सिद्धार्थ महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

दिनांक:- ११/४/ २०२५ येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे हे होते तर प्रोफेसर डॉ. सुनील मेढे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर श्याम सर्जे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना एक सुशिक्षित महिला शंभर शिक्षकांची बरोबरी करते तात्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्रियांची पिळवणूक होत असायची त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता त्याच काळात पाश्चिमात्य देशांमधल्या स्त्रिया शिक्षण घेऊन मतदानाच्या अधिकारासाठी झगडत होत्या तर भारतीय स्त्रिया शिक्षणापासून वंचितच होत्या.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून इतर स्त्रियांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक तसेच शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातही आपले योगदान दिले. असे सविस्तर मार्गदर्शन डॉ. श्याम सर्जे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.एस.एम. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सदरील कार्यक्रम हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

### मनिषा भिमराव पाटील वाकडे कार्यकारी सहाय्यक पदाची परीक्षा उतीर्ण

## मालेगाव गल्ली वासियांनी जंगी मिरवणुक काढून केला भव्य नागरी सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद शहरातील मालेगाव गल्लीतील शेतकरी भीमराव पाटील वाकडे याची मुलगी कुमारी मनिषा वाकडे ही बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल तिचे मालेगाव गल्लीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता सुरुवातीला कुमारी मनिषा वाकडे ही छत्रपती संभाजीनगर येथून आल्यानंतर तिचे मालेगाव गल्ली वासियांच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे फटाक्यांची आतिषबाजी करीत जोरदार स्वागत करून शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

तदनंतर मालेगाव गल्ली येथे आयोजित कार्यक्रमात तिचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे,सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख,लोकजागर संघटनेचे केशव पाटील जंजाळ,माजी नगराध्यक्ष दिपक पाटील वाकडे,आदर्श शेतकरी राजु पाटील वाकडे यांनी आपली मनोगत व्यक्त करीत मनिषा वाकडे इस पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी या सत्कार सोहळा निमित्त बोलताना पोलिस निरीक्षक प्रताप इंगळे म्हणाले की प्रत्येक आई-वडिलांनी मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला



पाहिजे जेणेकरून समाजातील अनेक मुली या अधिकारी होतील आणि समाजात आपल्या कार्याचा ठसा उमटवतील त्यांनी यावेळी मनीषाचे वडील भिमराव वाकडे व आई व भावाचे सुद्धा कौतुक केले.

या वेळी मनिषाने सुद्धा तिचे मनोगत व्यक्त केले ती म्हणाली की माझा इथपर्यंत प्रवास अतिशय खडतर होता अनेक अडचणींचा सामना करून मी हे यश गाठले आहे माझ्या या यशाचे श्रेय हे माझे आई,वडील,भाऊ व वहिनी यांना समर्पित करते माझ्या आईने माझ्या शिक्षणासाठी दररोज गावात भाजी विकली तर वडील व भाऊ वाहिनी यांनी दिवस रात्र शेतात राब राब राबून कष्ट करून मला शिक्षणासाठी पैसे पाठवले आहे खरच मी त्यांचे हे कष्ट मी कधीच विसरणार नाही प्रत्येक आई वडिलांनी जर प्रत्येक मुलीला शिक्षणासाठी प्रेरित करावे असे तिने यावेळी बोलतांना सांगितले.

या कार्यक्रमाचे संचालन विशाल वाकडे यांनी केले तर आभार अँड.शरद वाकडे यांनी मानले.यावेळी या कार्यक्रमास पोलिस उपनिरीक्षक सखाहरी तायडे,नगरसेवक रविराज जैस्वाल,माजी नगरसेवक बाळुभाऊ हिवाळे,फारुख कुरैशी, प्रा.सिद्धार्थ पैठणे,अण्णा वाकडे,सुरेश वाकडे,नंदकिशोर वाकडे, कृष्णा वाकडे,विष्णु वाकडे,मुकुंदा वाकडे,सरपंच शिवाजी भिसे,अंबादास काळे,विजय वाकडे,अर्जुन वाकडे,रवींद्र वाकडे,मधुकर वाकडे,सुधाकर वाकडे,बबन वाकडे,संदीप वाकडे,संजय छडीदार,पत्रकार प्रल्हाद लोणकर, अखिल भारतीय छावा संघटनेचे अध्यक्ष गणेश गायकवाड, संजय लोळगे,सुभाष लोळगे,विनोद वाकडे,अनिल गायके,शिवाजी लहाने,नारायण सोनूने, संदीप गणपत वाकडे,राहुल वाकडे तसेच मालेगाव गल्लीतील न्हावी गल्लीतील मुल्ला गल्लीतील तसेच जाफराबाद शहरातील नागरिक,महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.



उद्योजक संजू भाऊ खोतकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शिवसेनेचे शहर प्रमुख तथा गटनेते कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विष्णू भाऊ पाचफुले, किशोर महाराज तिवारी, मेघराज भैया चौधरी, राम निवास गौड, उमेश पंचर, दिलीप गौड, योगेश भाऊ ठक्कर, पांडू शेठ खैरे, रामा भुतेकर, आयुष्य राठोड दिसत आहेत.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अबंड तालुक्यातील शहागड ग्रामसंसदेत शुक्रवारी सकाळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रतिमेस ग्रामविस्तार अधिकारी व्हि.एम.राठोड, उपसरपंच अरबाज तांबोळी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी लिपीक रमेश शिनगारे,गिताराम खोसे,अजिम मनियार, रामेश्वर गव्हाणे,मोबीन तांबोळी, यांची उपस्थिती होती.

## तालुकाप्रमुखपदी पंडीत गावडे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील पंडीत राव विश्वनाथ गावडे यांच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या अंबड तालुका पदी निवड करण्यात आली व उप तालुकाप्रमुख पदी रजनीश कनके राहणार भांबेरी प्रभू बाम्हणे रा धाकलगाव यांची निवड करण्यात आली यावेळी विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री अंबादास दादा दानवे यांनी शाल व शिरफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्त 'जयभीम पदयात्रा' उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्ताने जिल्हा प्रशासन, सर्व शैक्षणिक संस्था, एनएसएस, एनसीसी, एनवायके यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात आज जयभीम पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.




जालना शहरात जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र, जिल्हा परिषद, विविध क्रीडा संघटना, मंडळे यांच्या विद्यमाने दि. १३ एप्रिल २०२५ सकाळी ०७.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ( नुतन वसाहत ) येथे पुष्पहार अर्पण करून पदयात्रा सुरुवात करण्यात आली. ही जयभिम पदयात्रा शनि मंदीरा पासून सुरु होवून - गांधी चमन- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (मस्तगड) यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून संपन्न झाली. यावेळी पदयात्रेस श्रीमती आरती चिल्लारे, सिद्धार्थ कदम क्रीडा मार्गदर्शक जिम्नॅस्टिक संतोष प्रसाद वरिष्ठ लिपिक , गुणवंत जिल्हा क्रीडा मार्गदर्शन तथा तायक्वांदो असो. चे अध्यक्षअरविंद देशमुख, गटशिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र काकडे अधिकारी श्री काकडे, श्री. पवार स्काऊट गाईड, जयपाल राठोड, राहुल गायके, जि. प. प्राथमिक प्रशालाचे मुख्याध्यापक व विद्यार्थी सरस्वती भवन माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला शिक्षक वृंद व विद्यार्थीहेविद्यार्थिनी आदी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# मंठ्यातील पोलिसांचे लंबे हात सट्टा चालकांवर कारवाई करतांना का आखडतात; एसपींनी लक्ष देण्याची मागणी

## सेलू तालुक्यातील सट्टा चालक येतो शनिवारी वसुलीला

**आयपीएल क्रिकेट सट्टा**
**भाग -४**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मागील महिन्यापासून सुरु असलेल्या क्रिकेटपट्यावर सेलू येथील बुक्की चालकामार्फत मंठा शहरांमध्ये कोट्यावधीची उलाढाल होत आहे. यामध्ये शहरातील नामवंत व्हाईट कॉलरवाले सेलू येथील बुक्की चालकाशी कनेक्टेड आहेत. यांच्याकडे प्रशासन का दुर्लक्ष करत आहे हे मात्र कळण्यास मार्ग नाही. या प्रकरणाकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष देण्यात यावे अशी मागणी सुज्ञ नागरीकातून होत आहे.

मंठा शहर असा ग्रामीण भागामध्ये मागील महिन्यापासून आयपीएल क्रिकेटचा सट्टयावर कमी पैशाला जास्त पैशाचे आमीषच दावून क्रिकेट सट्टा चालत आहे. सदर आयपीएल क्रिकेट सट्टा हा परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील व शहरातील व्यक्ती चालवतो. सदर व्यक्तीचे मंठा शहरातील काही वाईट कॉलर वाली राजकीय पुढारी आहेत. त्यांच्यामार्फत पुढे ५० ते ६० एजंट शहरातील गोरगरीब व श्रीमंत तरुणांना सत्ता खेळविण्यासाठी प्रावर्त करत आहेत. त्यामुळे गोरगरिबांचे संसार उघड्यावर आले आहे. याप्रकरणी गेल्या आठवड्यापासून दैनिक तरुण भारत आपल्या वृत्तपत्रातून निर्भीडपणे याविषयी वृत्तछापत आहेत. त्यांना देखील कुठल्या ना कुठल्या प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रशासन याकडे कुठलीच कार्यवाही का करत नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. विशेष म्हणजे आठवडाभर सट्ट्याच्या व्यवहार केला जातो. त्यानंतर आठवड्याच्या दर शनिवारी सेलू तालुक्यातील व्यापारी मंठा शहरातील एका व्यापाऱ्याच्या दुकानात येऊन कोट्यावधी रुपये वसुली घेऊन जातात. एवढे असताना देखील प्रशासन कार्यवाही का करत नाही. हे मात्र अद्यापही उमगण्यास तयार नाही. या सट्ट्याच्या पायी अनेक तरुण उध्वस्त झाले आहेत तर अनेक उद्योजक देखील बरबाद झाले आहेत. तरी देखील प्रशासन यावर कार्यवाही करत नसलेल्या आणखीन किती जण बरबाद होऊन शहर सोडण्याच्या तयारीत



आहेत. त्यामुळे या प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामीण लक्ष देऊन सट्टा चालक व एजंट वर कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकातून होत आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापुरात हनुमान जयंतीनिमित्त मूर्तीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

शहरात सार्वजनिक हनुमान जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने हनुमान मूर्तीची स्थापना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जय बजरंग जय वडार युवा प्रतिष्ठान तर्फे करण्यात आली.

हनुमान जन्मोत्सव सोहळा १२ एप्रिल ते १६ एप्रिल दरम्यान साजरा केला जाणार असुन विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.१६ एप्रिल रोजी शहरात भव्य स्वरूपात मिरवणूक काढली जाणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार यांनी दिली. याप्रसंगी लक्ष्मण पवार, धर्मराज पवार उपस्थित होते.

हनुमान मुर्तीची स्थापना प्रसंगी पूजारी नगर फाऊंडेनशनचे अध्यक्ष गणेश पूजारी, उपाध्यक्ष उमाजी गायकवाड, माजी नगरसेवक विजय कंदले, सोमनाथ पूजारी, उत्सव समिती अध्यक्ष सोमनाथ पवार, उपाध्यक्ष बाळू शिंगे, कोषाध्यक्ष सनी इटकर, सुरज इटकर, तुकाराम देवकर, मशा पवार, चंद्रकांत पवार, राम देवकर, संदीप पवार आदी उपस्थित होते.

मुर्ती स्थापना नंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली व सर्व हनुमान भक्तांना यावेळी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.



### संक्षिप्त वृत्त...



### उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचे राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेत यश

**उमरगा, दि.१३ एप्रिल -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलच्या संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील क्रीडा संकुलात ५ व ६ एप्रिल रोजी झालेल्या राज्यस्तरीय डॉट बॉल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल मधील १७ वर्षे वयोगटातील मुलांचा व मुलींच्या दोन संघाने सहभाग नोंदवला होता. धाराशिव जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे सचिव व उमरगा तालुक्यातील प्रसिद्ध क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेतील श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, मोहिनी घोडके, आलिया बागवान, श्रुती जाधव, अनोखी एरंडे, अस्मिता भोसले, प्रमिला जाधव, श्रावणी कोळी, समृद्धी रणदिवे, सुदर्शन शिंदे, आदित्य सगर, दुर्गेश दुबे,आर्शियांन शेख, पृथ्वीराज पालमपल्ले, अशोक वजनम, अंकुश निंगदळे, इस्माईल नदाफ या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना कोच धनराज तेलंग व महेम्मद फजल शेख, वजीर शेख व आदिनाथ गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.



### कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय येथे मेळावा संपन्न

**वाशी, दि.१३ एप्रिल -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे भारत सरकारच्या सूक्ष्म व लघु मंत्रालय उपक्रमाअंतर्गत व पसारा अक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांना कायमस्वरूपी नोकरीसाठी आय.एस.ओ मानांकित भारत सरकारच्या मान्यता प्राप्त शिवस्वराज सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.ली. डिपार्टमेंट आणि श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी चे कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जिल्हा धाराशिव (प्लेसमेंट सेल) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दि.३ ते ६ एप्रिल या कालावधीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे तसेच प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रा.डॉ बालाजी देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली जेष्ठ भरती अधिकारी गोरख जगताप, महेश सरतापे आणिराज रतन निकाळजे भरती मेळावा घेण्यात आला. या मेळाव्या मध्ये सेक्युरिटी गार्ड या पदासाठी १८० तरुणांनी सहभाग नोंदवला त्या पैकी १२३ तरुणांना पात्रतेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आली.



### डॉ. यशांजली गडदे यांचे एम.बी.बी.एस. परिक्षेत यश

**इटकळ, दि.१३ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील काळेगाव येथील शेतकरी कुटुंबातील डॉ. यशांजली दयानंद गडदे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई येथून एम.बी.बी.एस. पदवी प्रथम श्रेणीत मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. डॉ. यशांजली यांनी खडूस पुणे येथील दक्षिणा इंटरनॅशनल फाउंडेशनमध्ये एक वर्ष प्रशिक्षण घेतले आणि २०१९ मध्ये NEET परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होऊन पहिल्याच यादीत वैद्यकीय प्रवेश मिळवला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे काळेगाव व परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेतीस साड्यांचे कुंपण; वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्यांचा अनोखा प्रयोग

**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.१३ एप्रिल -**

देवणी तालुक्यातील वलांडी परिसरातील शेतकरी सध्या वन्यप्राण्यांच्या त्रासाने त्रस्त झाले आहेत. वन्यजीवांकडून होणाऱ्या सततच्या पिकांच्या नुकसानीमुळे शेती करणे अधिक कठीण झाले आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी वलांडी परिसरातील शेतकऱ्यांनी टाकाऊ रंगीबेरंगी साड्यांपासून पिकाभोवती कुंपण उभारण्याचा अनोखा उपाय शोधला आहे.



शेतीमध्ये हरीण, काळवीट, वानर आणि रानडुक्कर यांसारख्या वन्यप्राण्यांकडून होणारी नासाडी दिवसेंदिवस वाढत आहे. या प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सुमारे १०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी साड्यांचे कुंपण उभारण्याचा मार्ग स्वीकारला आहे. रंगीबेरंगी साड्यांमुळे वन्यप्राणी घाबरून पिकांपासून दूर राहतात, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

साड्यांचे कुंपण हा उपाय तात्पुरता असला तरी कायमस्वरूपी उपाय म्हणून तार कुंपणासाठी शासनाकडून आर्थिक मदतीची गरज असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. माधव बिरादार (धनेगाव), हनुमंत बिरादार (जवळगा), सागर तवडे (हिसामनगर), मधुकर कुलकर्णी (वलांडी) आदी शेतकऱ्यांनी तत्काळ मदतीची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांकडून अनेकदा वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, वनविभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचे आरोप होत आहेत. नुकत्याच घडलेल्या घटनेत धनेगाव शिवारात रानडुकराच्या हल्ल्यात राजकुमार वसंतराव बिरादार हे गंभीर जखमी झाले आहेत.

त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, वनपाल बरडे आणि घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना आर्थिक मदतीसाठी प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. यावर्षी मांजरा पट्ट्यातील धनेगाव उच्चस्तरीय बंधारा आणि इतर तलावांमध्ये मुबलक पाणीसाठा झाल्याने ऊस लागवड क्षेत्रात ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. परिणामी, ऊस आणि उन्हाळी पिकांवर वन्यप्राण्यांचा हल्ला वाढला आहे. त्यामुळे शेतकरी अधिकच त्रस्त झाले आहेत.

सरकारकडून अद्याप ठोस उपाययोजना न झाल्यामुळे साड्यांचे कुंपण हा शेतकऱ्यांच्या हाती उरलेला शेवटचा पर्याय बनला आहे.

वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी हा उपाय काही प्रमाणात यशस्वी ठरतोय, परंतु तो कायमस्वरूपी नाही. शासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना योग्य ती मदत करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा लोकार्पण सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे आणि सुशोभीकरणाचे लोकार्पण सोहळा नगरपरिषद कार्यालयाच्या वतीने भव्य समारंभाने पार पडला. पूर्णाकृती पुतळ्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते बटन दाबून पुतळ्याचे अनावरण पडदा काढण्यात आला.

याप्रसंगी हेलिकॉप्टर मधुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी पूर्ण आकृती पुतळा व्हावा म्हणून गेली २५ ते ३० वर्ष नागरिकांनी मोर्चे रस्ता रोको ठिय्या आंदोलन साखळी उपोषण आमरण उपोषण इत्यादी आंदोलने केली होती. अखेर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नाने तुळजापूरकरांचे स्वप्नपूर्ती झाली. पूर्णाकृती पुतळ्यासोबतच पुतळा परिसर सुशोभीकरण करण्यात आले आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते गोकुळ शिंदे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, माजी नगरसेवक अमर मगर, पंडितराव जगदाळे, नरेश अमृतराव, अमर हंगरगेकर, विजय कंदले, औदुंबर कदम, किशोर साठे, पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले, भाजपाचे शहर अध्यक्ष शांताराम पेंदे, रिपब्लिकन पक्षाचे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष तानाजी कदम, वंचित आघाडीचे नेते मिलिंद रोकडे, वैशाली कदम, हेमा कदम, भाजप तालुका उपाध्यक्ष संदीप गंगणे, राजेश कदम, बबन गावडे, खंडू जाधव, प्रशांत सोंजी, निलेश रोचकरी, धैर्यशील दरेकर, इंद्रजीत साळुंके, प्रकाश मगर, प्रताप कदम, शिवदास कांबळे, अस्मिता कांबळे, अरुण कदम, अमोल कदम, आनंद पांडागळे, वैजनाथ पंडागळे, आप्पा कदम, रवी वाघमारे, महादेव सोनवणे, दाजीबा कदम, आशिष कदम, निशान कदम, महादेव कदम, तानाजी डावरे यांच्यासह नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी अधिकारी आणि हजारोच्या संख्येने नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

*** तुळजापूर, दि.१३ एप्रिल -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात नवोदय स्थापना दिवस रविवार दि.१३ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. सर्वप्रथम नवोदय विद्यालय जनक स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सचिन खोब्रागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## जिल्ह्यात साकारणार अणु उर्जेवर आधारित शेतमाल प्रक्रियेचा मेगा प्रकल्प व कांदा महाबँक

### 'मित्रा' चे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ एप्रिल -**

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न वाढ देण्यासाठी कांद्याची महा बँक व अणुऊर्जेवर आधारित अन्न प्रक्रियेचा मेगा प्रकल्प धाराशिव जिल्ह्यात करण्याचे ठरले असून त्या अनुषंगाने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माध्यमातून २५० एकर जागा उपलब्ध करून देण्याचे ठरले असल्याची माहिती मित्राचे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रतिष्ठान भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता, शेतकऱ्यांच उत्पन्न वाढाव, दुप्पट व्हाव याकरिता 'मित्रा' च्या माध्यमातून राज्यात विविध प्रकल्प राबविले जात आहेत. जिल्ह्याचा आर्थिक दृष्ट्या कायापालट करणारा हा प्रकल्प 'मित्रा' च्या माध्यमातून जिल्ह्यात आणण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्याला विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांचे उत्पन्न वाढविण्यावर जाणीवपूर्वक भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून अणु ऊर्जेवर आधारित प्रक्रिया प्रकल्पांच्या माध्यमातून नाशवंत शेतमालाचे आयुर्मान वाढविणे तसेच प्रक्रिया केलेल्या शेतमालाच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ करण्याबाबत अनेक योजना जाहीर केल्या आहेत. या माध्यमातून शेती विषयक विशेषतः कांदा, फळे, फुल, भाज्या व इतर कृषी उत्पादनांना आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ उपलब्ध करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे उदिष्ट आहे.

जिल्ह्यासह सोलापूर, बीड व लातूर जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादित केला जातो. कांदा जास्त काळ टिकून रहात नाही. बाजार भावातील चढ उतारामुळे अनेकदा शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे कांद्या वर अणु ऊर्जेच्या माध्यमातून अभारी प्रक्रिया करून त्याचे आयुर्मान वाढविण्यात येणार आहे, जेणे करून दीर्घकाळ कांदा चांगल्या स्थितीत राहील. येथे प्रक्रिया केलेला शेतमाल १०० टक्के निर्यातक्षम असणार आहे. या प्रकल्पात सुमारे २ लाख मेट्रिक टन शेतमालाची वातानुकूलित साठवणूक करता येईल.

महाराष्ट्र इनस्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) च्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माळुंब्रा गावात हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात येणार आहे. हा प्रकल्प देश स्तरावर महत्वाचा ठरेल व यासाठी परदेशी गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न आहे. सुमारे ८०० कोटी रुपये या प्रकल्पासाठी लागणार असून पहिल्या टप्प्यात रु. १०० कोटी गुंतवणूक लागणार आहे. शास्त्रज्ञ व अणुऊर्जा आयोगाचे डॉ. अनिल काकोडकर व हिंदुस्तान ॲग्रोचे कार्यकारी अध्यक्ष भारत ढोकणे पाटील यांच्याशी याअनुषंगाने चर्चा केली आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचा विचार करून सर्वांनी सकारात्मकतेने यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आ. पाटील यांनी यावेळी केले.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची विक्रमी रक्तदाते विनायकराव पाटील-चाकूरकर यांची घेतली सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१३ एप्रिल -**

चाकूर येथील विक्रमी रक्तदाते तथा आनंदवनातील सेवक विनायकराव पाटील चाकूरकर यांच्या घरी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी विविध विषयावर व राज्यातील घडामोडीवर मनमोकळ्या चर्चा केल्या. यावेळी चाकूरकर पाटील परिवाराच्यावतीने त्यांचा डॉ. विकास आमटे लिखित आनंदवन प्रयोगवन व डॉ.प्रकाश आमटे लिखित नवी पिढी, नव्या वाटा या दोन ग्रंथासह फेटा, शाल, श्रीफळ देऊन विनायकराव पाटील, नम्रता पाटील, आश्लेषा व अक्षरा पाटील यांनी सत्कार केला.



चंद्रपूर जिल्ह्यातील आनंदवन येथे चालणाऱ्या विविध उपक्रमाची व सेवेची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जाणून घेतली. १२० वेळा रक्तदान केल्यामुळे विक्रमी रक्तदाते विनायकराव पाटील चाकूरकर यांचे अभिनंदन केले. यावेळी संगशेट्टी पाटील कोकळगावकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विलासराव पाटील-चाकूरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, गोविंदराव पवार, अनिल वाडकर, अशोक पाटील-चाकूरकर, डॉ.संजय हुडगे, ओम पाटील-चाकूरकर, अंकुश हुडगे, माधव सोनटक्के, दिलीप शेटे, विजयकुमार कदम, मोहनराव कुलकर्णी, संतोष उरगुंडे, संजय कस्तुरे, मधुकर कांबळे, संदीप शेटे, शंकर रायफळे, भानुदास साबणे उपस्थित होते.

## लोकसहभागातून वलांडी मंडळ अधिकारी कार्यालयाचा कायापालट



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१३ एप्रिल -**

देवणी तहसील अंतर्गत असलेल्या वलांडी येथील महसूल मंडळ कार्यालय इमारतीचा लोकसहभागातून कायापालट करण्यात आला आहे. त्यामुळे या मंडळी विभाग कार्यालयाचे रुपडेच बदलले आहे. तसेच ग्रामस्थांमध्ये महसूल विभागाबद्दलची आत्मीयता वाढली आहे.

तलाठी आणि महसूल विभाग म्हटले की दोन हात दूरच राहिलेले बरे, असे सर्वजण म्हणतात. मात्र येथे वर्षभरापूर्वी रुजू झालेले मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांनी कर्तव्य बजावण्याबरोबरच ग्रामस्थांमध्ये महसूल विभागाविषयी आत्मीयता आणि आदर निर्माण केला आहे.

या महसूल मंडळ विभागांतर्गत सतरा गावाचा समावेश असून या महसूल मंडळ कार्यालयात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांनी स्थानिक ग्रामस्थांना आवाहन केले. आणि ग्रामस्थांनी दातृत्वाचे हात पुढे केले.

त्यामुळे या मंडळी विभाग इमारतीचे रुपडेच पालटले आहे. पूर्वी असलेल्या छोट्या दोन खोल्याची डागडुजी करत टाइल्स, पीयूपी, लाईट फिटिंग, दारे खिडक्या बदलण्यात आले आहेत. इमारती भोवती संरक्षक भिंत व समोर मोठे लोखंडी गेट उभारण्यात आले आहे. त्याला लोखंडी जाळी बसविण्यात आली आहे.

परिसरातील शेतकऱ्यांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांना आपले काम करण्यासाठी वेगवेगळे टेबल तयार करण्यात आले आहेत. या मंडळाधिकारी कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे, तलाठी अतिश बनसोडे संगणक परिचालक ऋषिकेश वाघमारे, यांनी परिश्रम घेतले.

सुरुवातीला येथील मंडळ अधिकारी कार्यालयात बसण्यासाठी व्यवस्था नव्हती ग्रामस्थांनी लोकसभागातून केलेल्या सहकार्यामुळे रुपडे पालटले आहे. प्रत्येकाने कर्तव्याला प्राधान्य दिल्यास असे समाजोउपयोगी बदल घडू शकतात. विशेष म्हणजे गावातील ग्रामस्थांमध्ये महसूल कर्मचाऱ्या बद्दल जिव्हाळा निर्माण झाला आहे असे मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांनी सांगितले.

## गोडाळा येथे शिवपार्वती विवाह सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१३ एप्रिल -**

रेणापूर तालुक्यातील गोडाळा येथील श्री स्वयंभू शिवलिंग महादेव मंदिरात पारंपरिक आणि धार्मिक उत्साहात शिवपार्वती विवाह सोहळा संपन्न झाला. हा सोहळा गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थ व भाविकांच्या सहभागाने आयोजित केला जातो. यावर्षीही भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा मोठ्या थाटात पार पडला.



गावातून काढण्यात आलेल्या मानाच्या कावडीची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत पार पडली. कावड शिखर शिंगणापूरकडे मार्गस्थ झाली आणि मार्गावरील खलंगरी, रामराव कलवले कुटुंबीयांसह अनेक गावांमध्ये तिचे जल्लोषात स्वागत झाले.

शिखर शिंगणापूर येथे रात्री बारा वाजून पाच मिनिटांनी श्री महादेवाचा विवाह सोहळा मंत्रोच्चारासह संपन्न झाला. त्यानंतर मानकरी भाविकांनी परतीचा प्रवास करत बुधवारी गोडाळा येथे आगमन केले.

गावातील श्री स्वयंभू शिवलिंग महादेव मंदिर हे प्राचीन हेमाडपंथी शैलीतील असून, ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचा संगम या ठिकाणी असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या गोडाळा गावाने आपल्या परंपरेनुसार हा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडला.

सुरेश महाराज गोढाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तरुणांच्या विशेष पुढाकाराने कार्यक्रम पार पडला. गावकऱ्यांनी तरुणांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाविहार बावरीनगरच्या विकास कामांना गती : जिल्हाधिकारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ एप्रिल-**

एप्रिल भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था मुळावा यांच्या अंतर्गत महाउपासक डॉ. एस. पी. गायकवाड यांनी १९८८ साली स्थापन केलेल्या महाविहार बावरीनगर येथे शैक्षणिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून वैज्ञानिक दृष्टिकोन, समता आणि बंधुभावाचा संदेश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाकडून महाविहार बावरीनगरला तीर्थक्षेत्राचा (क) दर्जा प्राप्त झाला आहे.



या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाकडून ध्यान केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, भिक्खू व भिक्खूनी निवास, श्रामणेर-श्राविका निवास, भोजन कक्ष, अशोक स्तंभ, संरक्षण भिंत व अंतर्गत रस्ते अशा विविध कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यापैकी बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून, जगातील सर्वात उंच अशोक स्तंभाचे काम अंतिम टप्प्यात आहे. प्रशासकीय इमारतीचे कामही वेगाने सुरू आहे.

या कामांचा आढावा घेण्यासाठी ११ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा सुकाणू समितीची बैठक बावरीनगर (दाभड) येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून चालू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी अशोक स्तंभ, ध्यान केंद्र, प्रशासकीय इमारत यांच्या जागेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी सर्व कामांचा आठवड्याभरात आढावा घेण्यात येईल असे सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, वास्तुविशारद आणि कंत्राटदारांना 'परफॉर्मन्स ऑडिट', रोड मॅप, बार चार्ट अशा आधुनिक प्रणाली वापरण्याचे आदेश दिले. व्हॉट्सॲपसारख्या समाज माध्यमांचा वापर करून प्रगतीचा तात्काळ अहवाल देण्याची प्रणाली राबवण्यावरही भर दिला.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी कामांची गुणवत्ता आणि कालमर्यादेत पूर्णता यावर स्पष्टपणे लक्ष देण्याचे निर्देश दिले असून, बावरीनगर येथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा यंत्रणा निर्माण करणे आणि महामार्गावरून येणाऱ्या रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. यासाठी तहसीलदार अर्धापूर, गट विकास अधिकारी व पोलीस निरीक्षक यांना संयुक्त प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस डॉ. एस. पी. गायकवाड, तहसीलदार देवणीकर, महावितरणचे पंकज देशमुख, पोलीस उपनिरीक्षक विष्णुकांत कहाळे, सरपंच कांचन सूर्यवंशी, उपसरपंच अरविंद पांचाळ, डॉ. भत्ते खेम्म धम्म, डॉ. भत्ते सत्यपाल, डॉ. मिलींद भालेराव, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभागाचे अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# तीन राज्यांच्या सीमेवरील सगरोळीतून एक प्रकाशवाट

**तभा वृतसेवा**
**सगरोळी, दि.१३ एप्रिल-**

दुर्गम भाग दूरदृष्टीचा विकास! रोजगाराशी नाळ जोडणारा हा प्रयोग आता अनेकांसाठी दिशादर्शक ठरतो असून ' ऊर्जाबंधू ' प्रकल्पाच्या उपक्रमात १५ युवकांची नामांकित कंपन्यांमध्ये थेट निवड आहे हे विशेष.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाची आधिक माहिती अशी की महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटकाच्या सीमेवर वसलेले सगरोळी हे गाव (जि.नांदेड) दुर्गम भागात असूनही, येथे शिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी ही संस्था कटिबद्ध आहे. ग्रामीण




भागातील युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थेने राबविलेला 'ऊर्जाबंधू सोलर टेक्निशियन' हा उपक्रम कमालीचा यशस्वी ठरला आहे.

संस्थेच्या उद्यमिता लर्निंग सेंटर आणि प्रचोधन डेव्हलपमेंट सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने २१ दिवसांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम अलीकडेच राबविण्यात आला. या प्रशिक्षणादरम्यान युवकांना सोलर तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान, प्रात्यक्षिक अनुभव व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली.

प्रशिक्षणानंतर तात्काळ रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'सोलर एजन्सीज मिट' चे आयोजन करण्यात आले होते .या प्लेसमेंट प्रक्रियेत लक्ष्मी सोलर कंपनीने ७ आणि भारत सोलर कंपनीने ८ प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली. अशा प्रकारे एकूण १५ युवकांना थेट सोलर क्षेत्रात नोकरीची संधी मिळाली.

या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, हा उपक्रम केवळ प्रशिक्षणपुरता मर्यादित न राहता, दुर्गम भागातील युवकांना उज्वल भवितव्यासाठी दिशा देणारा एक प्रेरणादायी प्रयोग ठरतो आहे. संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी यांची ही धडपड ग्रामीण विकासासाठी एक आदर्श ठरत आहे.

# पत्रकार पवन जगडमवार यांना समाज परिवर्तन पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ एप्रिल-**

क्रांतिसुर्य ज्योतीराव फुले व विश्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त दरवर्षी राहुल लोहबंदे मित्रमंडळाच्या



वतीने उपेक्षित समाज घटकासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांना समाज परिवर्तन पुरस्कार दिला जातो.यावर्षीचा समाज परिवर्तन पुरस्कार पत्रकार पवन जगडमवार यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मुखेड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती माजी नगरसेवक राहुल लोहबंदे व समन्वयक रियाज चांदपाशा शेख यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

मुखेड तालुक्यातील आंबुलगा बु) सारख्या छोट्याशया गावात एका शेतकरी कुटुंबात पवन जगडमवार यांचा जन्म झाला. विद्यार्थीदशेत असताना शाळा, महाविद्यालय, विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन, मोर्चे, उपोषण करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. पुढे त्यांनी नांदेड विद्यापीठातून पत्रकारितेचे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर ते दैनिक देशोन्नतीमध्ये उपसंपादक म्हणून रूजु झाले आणि पत्रकारीतेच्या माध्यामातून जिल्ह्यातील समाजकारण, राजकारणासह गोरगरीब, कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी निर्भीड व परखडपणे लिखाण करून सर्वसामान्याचा आवाज शासन दरबारी मांडत आहेत.

# भीम जयंतीनिमित्त आज जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.१३ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज १४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद नांदेडतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता जिल्हा परिषद कार्यालय परिसरातून बँड पथकासह डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या अभिवादन सोहळ्यास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मेघना कावली प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मंजुषा कापसे, प्रशांत थोरात, नारायण मिसाळ, अमित राठोड, कार्यकारी अभियंते एस.जी. गंगथडे, ए.एन. भोजराज, राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, संवर्धन अधिकारी डॉ. प्रविणकुमार घुले, कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, माधव सलगर, एस.जे. अडबलवार, दिलीपकुमार बनसोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यानंतर सकाळी साडेदहा वाजता जिल्हा परिषद परिसरात अन्न व पाणी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सभागृहात बाबासाहेबांना अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता रुबाब भीमाचा या भिमगीतांच्या विशेष सादरीकरणाचा कार्यक्रम जिल्हा परिषद परिसरात होणार असून, सुप्रसिद्ध गायक बापूराव जमदाडे व त्यांचा संच यावेळी सादरीकरण करणार आहेत. या सर्व कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अधिकारी-कर्मचारी संयुक्त जयंती महोत्सव मंडळातर्फे करण्यात आले आहे. मंडळाचे अध्यक्ष रंजीत गजभारे, सचिव धनंजय गुम्मलवार, कार्याध्यक्ष राजेश जोंधळे, कोषाध्यक्ष सचिन चौदंते, प्रसिद्धी प्रमुख मिलिंद व्यवहारे यांच्यासह जितेंद्र तोटलवार, राघवेंद्र मदनुरकर, बालाजी नागमवाड, अशोक मोकले, पवन तलवारे, लक्ष्मीकांत मोटरवार, शेख मुकरम, संतोष मठपती, बालाजी महाजन, विक्रम रेंगूनटवार, मंगेश ढबरे, ज्ञानेश्वर वानखेडे, योगेश वाघ, शिवराज कोल्हे, महेश लोणीकर, उमाकांत हाळे, गजानन अगरमोरे, सतीश जकाते, राजू गोवंदे, शेख जाफर, राजरत्न ढोले, विजय कदम, आनंद सावंत इत्यादींनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### देगलूर उपजिल्हा रुग्णालयास एअर कूलर आणि थंड पाण्याचे वॉटर कूलर भेट

**देगलूर** -स्व. व्यंकूबाई शंकरराव तोटावार यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालय देगलूर गोरगरीब गरजू रुग्णांना उन्हाळ्याची झळ लागू नये म्हणून रुग्णांसाठी दोन एअर कूलर आणि एक थंड पाण्याचे वॉटर कूलर तोटावार परिवार, मलशेटवार परिवार, वरगणटीवार परिवार यांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या उपस्थितीत रुग्णालयास भेट करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी वस्तू स्वरूपात रुग्णालयास रुग्णांच्या हितासाठी दान करण्याचे आवाहन केले होते या आव्हानाला प्रतिसाद देत प्रसंगी तोटावार, मलशेटवार व वरगंटीवार परिवारांनी रुग्णाचे हित लक्षात घेता रुग्णालयास वस्तू स्वरूपात भेट दिले. या प्रसंगी तोटावार, मलशेटवार व वरगंटीवार परिवारातील सदस्य उपस्थित होते. सोबतच शहरातील डॉक्टर, पत्रकार, प्राध्यापक आणि व्यापारी मंडळी उपस्थीत होते. शहरात या परिवारांनी वेंकुबाई शंकरराव तोटावार यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी एअर कूलर आणि थंड पाण्याचे वॉटर कूलर दिल्या बदल सर्वत्र कौतुक होत आहे.

### गिता चिकनेपवाड यांची कार्यकारी साहाय्यक पदी निवड

**हिमायतनगर** -हिमायतनगर- तालुक्यातील नावलौकिक असलेल्या अंदेगाव सारख्या छोटूशा गावातील गिता राजेश चिकनेपवाड यांची मुंबई महानगरपालिकेत सरळ सेवेत अंतर्गत घेण्यात आलेल्या कार्यकारी साहाय्यक पदी निवड झाली आहे. सरळ सेवा अंतर्गत घेण्यात आलेल्या या पदासाठी एकुन १८४८ जागा उपलब्ध होत्या त्यापैकी भटक्या जमाती पैकी कूमारी गिता राजेश चिकनेपवाड हीची निवड झाली आहे. कु.गिता चिकनेपवाड हिचे वडील हे आदेगांव सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हिमायतनगर व समाज संघटनेचे तालुका उपाध्यक्ष या पदावर विराजमान आहेत,आदेगाव खेड्यातील समाज हा स्त्री शिक्षणाचा अनादर करत आसतांना त्यांनी महात्मा फुले यांचे ब्रिद वाक्य स्त्रि शिक्षणाशिवाय आपल्या परीवाराचा उद्धार होणार नाही.हे वाक्य आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले ० आपल्या मुलीला शिक्षण देऊ केले, कुमारी गिता हिने आपल्या शिक्षणात कूठलीच कसर न ठेवता आलेल्या परीक्षेत मजल मारुन गरुडझेप घेत आपल्या आई वडिलांचे नावांचा ठेसा समाजात उमटविला आहे. गिता हे मोठ्या घरातून असल्यामुळे प्राथमिक शिक्षण हे गावात झाले असून बालवयात शिक्षणाची आवड होती पुढे माध्यमिक व कॉलेज जीवनात अतिशय मेहनती सरळ सेवे अंतर्गत परीक्षेत उत्तीर्ण होऊन चांगल्या प्रकारे मार्क्स मिळवत गोल्ला गोलेवार यादव समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. कु.गिता राजेश्वर चिकनेपवाड हिच्या यशाबद्दल गोल्ला गोलेवार यादव समाजातून व तालुक्यातील समाज बांधव सुभाषराव शिलेवाड, बाबाराव जरगेवाड,संजय काईतवाड,पर्वत काईतवाड श्याम जक्कलवाड,अभिषेक बकेवाड नारायण कोरेवाड यांनी शुभेच्छा दिले आहे व समाजातून गावातून मित्रपरिवारातून मोठ्या प्रमाणात भरभरून कौतुक होताना दिसून येत आहे.

# किनवट येथे श्री अय्यप्पा स्वामी देवालयामध्ये 'विशु महोत्सव'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१३ एप्रिल-**

येथील श्री अय्यप्पा स्वामी देवालयामध्ये सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ रोजी भव्य 'विशु महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. मेष संक्रांतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या दिवशी सकाळी ७.०० वाजता हवन व पूजन, तसेच सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत महाप्रसाद (भंडारा) होणार आहे. यानंतर सायंकाळी ७.०० वाजता महापडीपूजा होणार असून भाविकांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उत्सवात श्रीकांत स्वामी व श्रीनिवास स्वामी संच, आदिलाबाद यांचा भजनी मंडळ सहभाग घेणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ब्राह्मण संघ संयोजक संकेपल्ली भरत कुमार शर्मा (हैदराबाद) असतील.

कार्यक्रमाचे आयोजन श्री अय्यप्पा स्वामी देवालयम, किनवट यांच्या वतीने करण्यात आले असून विविध धार्मिक कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सर्व भाविक भक्तांनी कार्यक्रमास उपस्थित राहून पुण्यसंचय करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# अवैध प्रवाशी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.१३ एप्रिल-**

तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर व अन्य रस्त्यावर दररोज एक किंवा दोन अपघाताच्या घडत आहेत.त्या अपघाताच्या घटना घडू नये म्हणून अर्धापूर पोलिसांनी वाहन तपासणी मोहीम सुरू केली आहे. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या १० गाड्यांवर शनिवारी (ता.१२) कारवाई करण्यात आली. अर्धापूर शहरात वाहनांवरील कारवाई टाळायची असेल तर जुना प्रलंबीत दंड तात्काळ भरावा असे आवाहन अर्धापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी वाहन चालकांना व वाहन मालकांना केले आहे.




अर्धापूर तालुक्यात मागील दोन ते तीन महिन्यांपासून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पोलीसांनी अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी वाहन तपासणी विशेष मोहीम सुरू केली आहे.त्यात अवैध प्रवासी वाहतूक, लायसन्स नसणे, कागदपत्रे नसणे, गाडीवर जुना प्रलंबीत दंड, क्षमते पेक्षा जास्त प्रवासी बसविणे, पुढे प्रवासी बसविणे यासह अन्य कारणाने वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. वाहनांची तपासणी दरम्यान मोठ्या प्रमाणावर वाहनांवर प्रलंबीत दंडाची रक्कम असल्याचे निदर्शनास येत आहे. ज्या वाहनांवर प्रलंबीत दंडाची रक्कम आहे. त्यांनी कोणत्याही वाहतूक पोलीसांकडे, किंवा महामार्ग पोलीसांकडे, जिल्ह्यातील कोणत्याही वाहतूक पोलीसांकडे दंडाची रक्कम भरता येत.अर्धापूर शहरातील व तालुक्यातील वाहनांवरील कारवाई टाळायची असेल तर दंडाची रक्कम तात्काळ भरावी असे आवाहन वाहन चालकांना व वाहन मालकांना अर्धापूर वाहतूक पोलीसांनी केले आहे.

# मुक्रमाबादेत शंभू महादेवाची रथातून मिरवणूक

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.१३ एप्रिल-**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील हेमाडपंती महादेव मंदिर येथे मागील आठवडाभरापासून यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम सुरू असून शनिवारी पहाटे शंभू महादेवाची भव्य विशालकाय रथातून मिरवणूक काढण्यात आली.



त्यानंतर भाविकांनी दोरखंडाच्या साह्याने बांधलेल्या विशालकाय रथाला सहजगत्या अग्निपुंड सोहळ्यापर्यंत ओढत घेऊन जातात. तेथे पोहोचल्यानंतर भव्य अग्नि कुंड सोहळा पार पडतो व येथील पूजा विधी संपन्न होऊन महाआरती झाल्यानंतर भाविक अग्नीच्या निखाऱ्यावरती पाय ठेवून पुढे चालत असतात. शंभू महादेवाच्या यात्रा महोत्सवातील अग्निकुंड सोहळ्याच्या निखाऱ्यावर मनोभावे कामना करून तुडवलेला निखारा भाविकांची मनोकामना पूर्ण करणारा ठरतो अशी वयोवृद्ध भाविकांची श्रद्धा आहे.

तेथून हा विशाल महाकायरथ परत महादेव मंदिराकडे मार्गस्थ होऊन मंदिरात पोहोचतो. यावेळी मुक्रमाबादसह परिसरातील हजारो शिवभक्त भाविक हा भव्य दिव्य सोहळा याची देह याची डोळा अनुभवण्यासाठी व शंभू महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड, दि.१२ एप्रिल-**

जिल्हा युवा पुरस्कार सन २०२४-२५ साठी अर्ज सोमवार २१ एप्रिल २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवा-युवती व युवा विकासाचे कार्य करणाऱ्यांनी पुरस्काराचे अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# व्हायरल हेपेटायटीस गंभीर रुग्णावर यशोदा हॉस्पिटल सिंकदराबाद येथे उपचार




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ एप्रिल-**

सिकंदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलच्या टिमने आपल्या अचूक निदानातून आणि उपचारातून परभणी येथील २७ वर्षीय युवक विशाल गरूड यांची व्हायरल हेपेटायटीस म्हणजेच अतिगंभीर कावीळ संसर्गातून मुक्तता करून त्यांना जिवनदान दिले अशी माहिती शनिवार दि.१२ एप्रिल रोजी हॉटेल चंद्रलोक येथे आयोजित पत्रकार परिषेदेत डॉ. दुर्गेश साताळकर यांनी यावेळी दिली.

पुढे त्यांनी सांगितले की व्हायरल विषाणूजन्य हेपेटायटीसमध्ये विषाणूंचा संसर्ग यकृतामध्ये जाऊन यकृताला सूज येते. हे विषाणू यकृताला हानी पोहचवून त्याच्या कार्यांवर परिणाम करतात त्यामुळे शरीरात टॉक्सिन्स अर्थात विषारी पदार्थ निर्माण होतात सदरील रुग्णाबाबतीत अशाच प्रकारे गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती यात रुग्ण अगदी तरुण वयात डायलिसीसवर गेला होता व लिव्हर ट्रान्सप्लांट करण्याची वेळ आली होती त्याचबरोबर तो मल्टी ऑर्गन फेल्युअर मध्येही गेला होता परंतु नियोजनबद्ध उपचारांतून व्हायरल हेपेटायटीस यशस्वी उपचार केल

## डॉ. आंबेडकर जयंती निमित्त अल्पोहाराचे वाटप

**तभा वृतसेवा**
**उमरी , दि.१३ एप्रिल-**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रील रोजी गोवंदे परिवाराकडून अल्पउपहाराचे आयोजन करण्यात आले आहे .

भारतीय लोकशाहीचे घटनाकार , समता स्वातंत्र्य बंधुता मुलमंत्र देणारे विद्वान पंडित क्रांतीसुर्य डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांची १३४ वी जयंती दि १४ एप्रील २०२५ रोजी पासुन संबंध देशात साजरी होते आहे. त्या अनुषंगाने उमरी शहरात माहिती अधिकार तालुकाध्यक्ष उमरी संदिप गोविंदराव गोवंदे यांनी त्यांची आई स्व . सावीत्राबाई पुंडलिकराव गोवंदे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ नगर परिषदेच्या जवळील आंबेडकर चौकात नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी दि १४ एप्रील रोजी अल्प उपहाराचे आयोजन करण्यात आले असुन या अल्पउपहाचा स्वाद घ्यावा असे आवाहन संदिप गोवंदे परिवाराकडून करण्यात आले आहे.

# आ. बाबुराव कोहळीकर सार्वजनिक उपक्रम समितीवर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.१३ एप्रिल-**

महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालयाअंतर्गत येणाऱ्या सार्वजनिक उपक्रम समितीवर हदगाव, हिमायतनगर विधानसभेचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १८९ अन्वये समिती मार्फत समितीची रचना, तिची व्याप्ती, कामकाज चालविणे, विविध कामांच्या तपासणीसाठी विषयांची निवड, अभ्यास गटाची नियुक्ती आदी कामे समितीमार्फत पाहीली जातात. विधानसभेने केलेल्या नियमान्वये प्रस्थापित केलेल्या सार्वजनिक उपक्रम समिती वर प्रतिनीधीत्व करण्यासाठी विधान परिषदेकडून पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर आपल्या सदस्यांमधून सभापती पाच सदस्यांची निवड या समितीवर करतात. त्यामध्ये आ. बाबुराव कदम कोहळीकर यांची निवड झाल्याची माहिती आमदारांचे स्वीय सहाय्यक बबन कदम यांनी दिली. या समितीच्या अधिकारात गृहविभाग, गृहपरिवहन विभाग, वनविभाग, महसूल विभाग, नगरविकास विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, उद्योग विभाग, उद्योग व खनीकर्म विभाग, उर्जा विभाग आदी विभाग येतात.

या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, दंत शल्य चिकित्सक डॉ पूजा काळे, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, समुपदेशक दिनेश तळणे तसेच केस रजिस्ट्री सहाय्यक सुनील तोटेवाड व मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे मंगेश गायकवाड तसेच बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्सटेबल ए.एस.अचेवाड व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# हिंगोलीत निमा डे निमित्त आयोजित रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन च्या स्थापना दिवसानिमित्त निमा हिंगोली जिल्हा व निमा वुमन्स फोरम हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नप्रभा हॉस्पिटल हिंगोली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार तानाजीराव मुटकुळे होते. या शिबिरामध्ये तसेच निमा स्थापनाच्या कार्यक्रमाकरिता जिल्ह्यातील सर्व निमा सदस्य वुमन्स फोरमचे सदस्य सामील झाले होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या शिबिरामध्ये साधारणतः २० रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. यावेळी नारायण खेडेकर, भारत शिंदे, पुंजाजी गवळी, लिंबोळे, विजयकुमार बोराळकर, डॉ प्रदीप विश्वंभर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर निमा पदाधिकारी महाराष्ट्र निमा प्रवक्ता डॉ गजानन धाडवे, निमाचे अध्यक्ष डॉ भगवान गिरी सेनगाव निमाचे अध्यक्ष डॉ अमर काळबांडे, निमा वुमेन्स फोरमचे अध्यक्षा डॉ वैशाली गिरी, सचिव प्राजक्ता मेने कोषाध्यक्ष रागिनी सावळे, निमाचे सचिव पंजाब लोंढे कोषाध्यक्ष डॉ सुशील सावळे माझी वुमेन्स फोरम अध्यक्ष डॉ दिपाली धाडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोबतच डॉ सोनम साहू, सौ काळबांडे, दीपक डहाळे तसेच सौ डहाळे, डॉ सुषमा विसलकर, डॉ संजय घुगे डॉ देविदास सुपरकर, डॉ धनंजय गोरे, डॉ राजेश धामणे डॉ रामदास शिंदे, डॉ संदीप मस्के, डॉ विनोद शिंदे, डॉ पुरुषोत्तम काळे, डॉ.शिवाजी विसलकर, डॉ अनुराग डहाळे, डॉ दीपक मोरे, डॉ अमोल दर्गू, गजानन साबळे, वैभव गवळी, अक्षय घाटोळे तसेच जिल्हा सामान्य रक्तपेढी टीमची डॉ वेदांतीका पाटील वैद्यकीय अधिकारी संतोष सोनटक्के, सचिन ठाकरे, प्रदीप चिखलकर, अर्पित यादव, समीर शेख यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्राजक्ता मेने तर आभार डॉ सुषमा टाक विसलकर याने मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मुलींच्या कबड्डी स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

शारीरिक शिक्षक संघटना तसेच हिंगोली बहुजन शिक्षक क्रीडा संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त तालुका क्रीडा संकुल हिंगोली येथे हिंगोली जिल्ह्यातील मुलींच्या वजनी गटातील ४८ किलो कबड्डी स्पर्धा आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा.डॉ.बंकट यादव, क्रिडाशिक्षक हिम्मतराव मोरे, डॉ. संजय नाकाडे अध्यक्ष क्रीडा भारती जिल्हा अध्यक्ष, क्रीडा अधिकारी अधिकारी आत्माराम बोथिकर, मारुती कोरडे, शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष रमेश गंगावणे, पंच-दत्तराव बांगर, बबलू पठाण, रामजी मुकाडे, रामदास हनुमंते, शम्मी पटेल, यावेळी शिवाजीराव इंगोले, साहेबराव सूर्यवंशी, संजय भुमरे, विश्वास वानखेडे, रामप्रसाद व्यवहारे, सत्यप्रकाश नांदापूरकर, श्रीमती अनिता कांबळे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेत हिंगोली जिल्ह्यातील मुलींचे सोळा संघ सहभागी झाले. यावेळी ग्रामीण भागातील मुलींच्या संघाने उत्तम कामगिरी केली. मुलींचे अनेक सामने चुरशीचे झाले. या स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने क्रिडा रसिक यांची उपस्थिती होती. स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या संघांना मान्यवरांच्याहस्ते बक्षीसाचे वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत प्रथम बक्षीस दिलीपराव चव्हाण, द्वितीय बक्षीस अनिल नैनवाणी तृतीय बक्षिस जगजीत खुराना, चौथी बक्षीस शारीरिक शिक्षक संघटना हिंगोली यांच्या वतीने देण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षक संघटना हिंगोली यांनी यशस्वीरित्या आयोजन केले.

# महात्मा फुले, डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त रूग्णांना फळे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**



महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने जिल्हा सामान्य रुग्णालय येथील रुग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांना फळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण आडगावकर यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी डॉ. दीपक मोरे, डॉ. गोपाल कदम, डॉ. चिंचकर, प्राचार्य कुलदीप कांबळे, गजानन वैद्य, सरपंच सिद्धार्थ इंगळे, सरपंच संघपाल जाधव, सुरेश पठाडे, अविनाश कांबळे, राजीव दरवडे,राहूल इंगळे, परमेश्वर वैद्य, गजानन घनघाव, सम्यक कांबळे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

दरम्यान पोलिसांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या २० जयंतींना मिरवणुकीसाठी परवानगी दिली असून ५ ठिकाणी जयंती साजरी करण्यात येणार आहे. मिरवणुकीत डीजेला पोलिसांनी परवानगी नाकारली असून आदेशाचे व नियमांच पालन करण्यासाठी पोलिसांनी मंडळांना सूचना दिल्या असून शहरातील प्रमुख मार्गावरून पोलिसांनी परवानगी दिली आहे. डी जे लावून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहीती पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी दिली आहे.



**हिंगोली– भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सोमवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहर पोलिस ठाण्याच्यावतीने शहरातून विविध प्रमुख मार्गावरून पोलिसांनी पथसंचलन केले. यावेळी पोनि नरेंद्र पाडळकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. छाया– सुनील पाठक**

# मी वडार शाखेच्यावतीने हनुमान जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

येथील मी वडार जिल्हा शाखा हिंगोलीच्या वतीने हनुमान जयंती निमित्त हनुमान जयंतीनिमित्त आयोजन करण्यात आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून हनुमान मिरवणुक काढण्यात आली. श्री हनुमानाची भव्य आरती करण्यात आली. महाआरती आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मी वडार महाराष्ट्राचा हिंगोली जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब देवकर, उपजिल्हाध्यक्षमाणिकराव बोंलतवार, कोषाध्यक्ष किशन सोळंके, सचिव सुरेश देवकर, मधुकर जाधव, बाळू देवकर, सुभाष देवकर, राम देवकर, प्रभू देवकर, काळूराम जाधव, निखिल देवकर, बाळू सोळंके, बाबाराव जाधव, शंकर सोळंके, लक्ष्मण पापळकर, संतोष जाधव यांच्यासह समाज बांधवांसह शहरातील नागरिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाची आढावा बैठक, सदस्य नोंदणीवर भर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाची राष्ट्रवादी भवन येथे मराठवाडा प्रभारी जयप्रकाश दांडेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी सदस्य नोंरणीसाठी मेळावे तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्यानिवडणुकीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

येथील राष्ट्रवादी भवनात आयोजित बैठकीत जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी सभापती मुनीर पटेल, माजी जिप उपाध्यख अनिल पतंगे, तालुकाध्यख माधव कोरडे, माजी जि प उपाध्यक्ष मनिष आखरे, अभिजीत देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना दांडेगावकर यांनी राष्ट्रवादी पक्ष वाढविण्यासाठी तालुका व सर्कल स्तरावर मेळावे आयोजित करून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करणे तसेच सभासदांना नियुक्त्या देणे, राष्ट्रवादी पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहयविण्याचे आवाहन केले. तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर पालिका, नगर पंचायतच्या निवडणुकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे आवाहनही दांडेगावकर यांनी केले. या बैठकीत सर्व तालुका अध्यक्ष विधान सभा अध्यक्ष, शहराध्यक्ष सर्व सेलचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी दौलत हुंबड, रमेश सानप, रवि गडदे, आयुब पापुलर,सलीम, गणेशराव गडदे, बाबा, कैलास देशमुख, राजकुमार देशमुख, बंडु मुटकुळे अवधुत निळकंठे, अशोक श्रीरामे सोनु चव्हाण, शाम कदम, भास्कर कुऱ्हे, अमिर अली, अमित कळासरे, संचित गुंडेवार, रशिद तांबोली, मनोहर पोपळीईत आदींची उपस्थिती होती..

# आज डॉ बाबासाहेब आंबेडकर पूतळा समितीच्यावतीने जयंतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**



युगप्रवर्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक जयंती महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे साजरी करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांच्याहस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण दुपारी २:१५ मिनिटांनी होणार आहे. विशेष अतिथी खा नागेश पाटील आष्टीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, आ. तानाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर, आ. चंद्रकांत उर्फ राजू भैया नवघरे, आ. डॉ. प्रज्ञाताई सातव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, सहायक आयुक्त यादव गायकवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, माजी आमदार, माजी नगराध्यक्ष, पत्रकार ,वकील संघ, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, शहरातील सर्व महिला मंडळ उपस्थित राहणार आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष मधुकरराव मांजरमकर, पुतळा समितीचे कोषाध्यक्ष जगजीतराज खुराना, पुतळा समितीचे पदाधिकारी, सदस्य, यांनी कळविले आहे.

दरम्यान पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी रविवारी पूतळा समितीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेत पाहणी केली आहे.

# हिंगोली डेक्कन स्टेशनसाठी २१.५ कोटी रूपयांचा निधी– केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ एप्रिल**

भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्राच्या रेल्वे पायाभूत सुविधेत होत असलेल्या दर्जेदार सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री.वैष्णव यांचे आभार मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, लोहमार्ग टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, संगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे, जसे की – अकलकोट रोड, दौंड, इगतपुरी, चांदा फोर्ट, माळाड, डोंबिवली, चिंचवड, इत्यादीचा समोवश आहे.



या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. अजनी स्टेशन (२९७.८ कोटी), नागपूर जं. (५८९ कोटी), नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी जं. (१७.४ कोटी), जालना (१८९ कोटी), संभाजीनगर (२४१ कोटी), रोटेगाव (१२ कोटी), अहिल्यानगर (३१ कोटी), भायकुला (३५.५ कोटी), चिंचपोकळी (५२ कोटी), चर्नी रोड (२३ कोटी), छत्रपती शिवाजी महाराज टमिनल (१८१३ कोटी), ग्रॅंट रोड (२७ कोटी), लोवर परेल (३० कोटी), मरिन लाईन्स (२७.७ कोटी), सण्डहर्स्ट रोड (१६.४ कोटी), मुर्तिजापूर स्टेशन (१३ कोटी), बडनेरा (३६.३ कोटी), बारामती (११.४ कोटी), दौंड (४४ कोटी), केडगाव (१२.५ कोटी), परळी वैजनाथ (२५.७ कोटी), भंडारा रोड (७.७ कोटी), गोंदिया ४० कोटी), तुमसर रोड (११ कोटी), टिटवाळा (२५ कोटी), शेगाव (२९ कोटी), बल्लारशाह (३१.४ कोटी), चंद्रपूर (२५.५ कोटी), चांदा फोर्ट (१९.३ कोटी), धुळे (९.५ कोटी), लासलगाव (१०.५ कोटी), मनमाड (४५ कोटी), नगरसोल (२०.३ कोटी), नांदगाव (२० कोटी), आमगाव (७.८ कोटी), वडसा (२०.५ कोटी), हातकंनगले (६ कोटी), हिमायतनगर (४३ कोटी), हिंगोली डेक्कन (२१.५ कोटी), किनवट (२३ कोटी), चाळीसगाव (३५ कोटी), अंमळनेर (२९ कोटी), धरणगाव (२६ कोटी), पाचोरा जं. (२८ कोटी), दिवा (४५ कोटी), मुंब्रा (१५ कोटी), शहाड (८.४ कोटी), कोल्हापूर – छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (४३ कोटी), लातूर (१९ कोटी), जेऊर (२० कोटी), कुर्डूवाडी जं (२० कोटी), फलटण (१ कोटी), वाठर (८ कोटी), आकुर्डी (३४ कोटी), चिंचवड (२०.४ कोटी), देहू रोड स्टेशन (८.०५ कोटी), तळेगाव स्टेशन (४०.३४ कोटी), मालाड स्टेशन (१२.३२ कोटी), कुर्ला जं. स्टेशन (२८.८१ कोटी), कांजुरमार्ग स्टेशन (२७ कोटी), विद्याविहार स्टेशन (३२.८ कोटी), विक्रोळी स्टेशन (१९ कोटी), जोगेश्वरी स्टेशन (११९ कोटी), माटुंगा स्टेशन (१७.३ कोटी), परळ स्टेशन (१९.४ कोटी), प्रभादेवी (२१ कोटी), वडाळा स्टेशन (२३ कोटी), भोकर स्टेशन (११.३ कोटी), धर्माबाद स्टेशन (३० कोटी), मुखेड जं.स्टेशन (२३ कोटी), उमरी स्टेशन (८ कोटी), देवळाली स्टेशन (१०.५ कोटी), इगतपुरी स्टेशन (१२.५ कोटी), धाराशिव स्टेशन (२२ कोटी), गंगाखेड स्टेशन (१६ कोटी), मनवथ रोड स्टेशन (१२ कोटी), परभणी जं. स्टेशन (२६ कोटी), परतूर स्टेशन (२३ कोटी), पूर्णा जं. स्टेशन (२४ कोटी), सेलू स्टेशन (२३.२ कोटी), हडपसर स्टेशन (२५ कोटी), गोधनी स्टेशन (२९ कोटी), काटोल स्टेशन (२३.३ कोटी), कामठी स्टेशन (७.७ कोटी), नरखेड जं. स्टेशन (३७.६ कोटी), कराड स्टेशन (१२.५ कोटी), सांगली स्टेशन (२४.२ कोटी), लोणंद जं.स्टेशन (१०.५ कोटी), सातारा स्टेशन (३४.३ कोटी), बेलापूर स्टेशन (३२ कोटी), कोपरगाव स्टेशन (३० कोटी), सेवाग्राम स्टेशन (१८ कोटी), धामणगाव स्टेशन (१८ कोटी), हिंगणघाट स्टेशन (२२ कोटी), पुलगाव स्टेशन (१६.५ कोटी), उरूली स्टेशन (१३ कोटी), वाशिम स्टेशन (२०.३ कोटी), मलकापूर स्टेशन (१९ कोटी), नांदुरा स्टेशन (१०.६ कोटी), रावेर स्टेशन (९.२ कोटी), सावदा स्टेशन (८.५ कोटी), दुधनी स्टेशन (२२ कोटी), पंढरपूर स्टेशन (४० कोटी), सोलापूर स्टेशन (५६ कोटी), नंदूरबार स्टेशन (१५ कोटी) आणि पालघर स्टेशन (१७.५ कोटी).